ठाणे, सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ वर्ष : १४, अंक : २८३, पाने : १६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## संघ, भाजपाचे अच्छे दिन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, संघाची भूमिका, विचारसरणी आणि राजकारणाशी असलेले संबंध याबाबत देशभरात पुन्हा एकदा

.....पान ४ वर






# ना.एकनाथजी शिंदे- गोरगरीब माता- भगिनींचा आधारवड

**भारतीय राजकारणात अनेक नेत्यांना व राज्यकर्त्यांना आपल्या वाडवडीलांचा- पूर्वजांचा राजकीय वारसा लाभून ते सहजपणे सत्तास्थानी विराजमान झालेत.मात्र शिवरायांच्या साताराचा *एकनाथ* हे त्याला अपवाद ठरले आहेत. त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने शून्यातून विश्व निर्माण केलं. त्यांचा नगरसेवक ते मंत्री-मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री हा यशस्वी राजकीय प्रवास खरोखर प्रशंसनीय राहिला आहे.खरं तर,हीच त्यांच्या यशस्वी राजकीय प्रवासाची यशगाथा होय.**



ना.एकनाथजी शिंदे- गोरगरीब माता- भगिनींचा आधारवड*

एकनाथजी यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९६४ रोजी वंदनीय गंगूबाई आईसाहेब यांच्या उदरी झाला,अन् जणू गोरगरीब,कष्टकरी लोकांचा आश्रयदाता उदयास आला.भाईंच्या वडिलांचे नाव संभाजीराव तर,महाबळेश्वर तालुक्यातील *दरे* हे त्यांचं मूळगाव.शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल,परखड अन् ओजस्वी वाणीनं प्रेरित होऊन,तर धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांच्या भगव्या विचाराच्या शिकवणीने वयाच्या अवघ्या २० वर्षीच भगवा हाती घेऊन आख्या राज्याला भगवामय करण्याचं प्रशंसनीय कार्य केलं.

परंतु दुर्दैवानं एक काळा दिवस उजाडला.अन् २००१ मध्ये दिघेसाहेबांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू होऊन ठाणेकरांवर दुःखाची अवकळा पसरली. संपूर्ण ठाणे शहर सुन्न झालं. प्रत्येकाला आपल्या घरातील थोरली व्यक्ती गेल्याचे दुःख झालं.त्यानंतर शिवसेनाप्रमुखांनी ठाणे जिल्हा प्रमुखाची जबाबदारी शिंदेसाहेबांना सोपविली. ठाणे जिल्हा शिवसेना प्रमुख पदाचं उत्तरदायित्व यांच्या हाती आलं.गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांचा वारसा पूर्णक्षमतेचे चालवत,सर्वांना बरोबर घेऊन मोठ्या आत्मविश्वासाने एकनाथजी राजकारणातून समाजकारण करत म्हटल्या जातात.आपला सुपुत्र *श्रीकांत* यास डॉक्टर बनविण्याचं स्वप्नही लताताईंनी कठोर परिश्रम घेऊन खरं करून दाखविलं. यास्तव आम्ही समस्त शिवसैनिक सौ.लताताईंना *आई* म्हणून वंदन करतो.

ना.शिंदेसाहेबांच्या सूचनेनुसार राज्यातील विविध भागांमध्ये सुमारे एक हजाराहून अधिक आरोग्य शिबिरे आयोजित केल्याने लाखों लोकांनी या शिबिरांचा लाभ घेतला.त्यामुळे कोरोना काळात लोकांच्या आरोग्याचे खऱ्या अर्थाने रक्षण झाले.या महत्वपूर्ण कार्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक प्रमुख मंगेश चिवटेसर,कक्षाचे कार्याध्यक्ष रामहरी राऊत,

सहप्रमुख ज्ञानेश्वर धुळगंडे आणि मदत कक्षाच्या टीमचे मोठं योगदान लाभलं असून, *रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा* हे ब्रीद त्यांनी कृतीनं खरं करून दाखविलं,याचा आम्हा तमाम शिवसैनिकांना सार्थ अभिमान आहे.

*कार्य सम्राट* अन् *विकास पुरुष* म्हणून जनमानसात ओळख असलेल्या शिंदेसाहेबांनी *वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती* सरकारी कार्यालयात साजरी करण्याचा निर्णय घेतला. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत *जय.. जय..महाराष्ट्र माझा* या गौरवशाली गाण्याला त्यांनी राज्यगीताचा दर्जा दिला. उल्लेखनीय गोष्ट राजकारणातून समाजकारण करताना त्यांनी आपली हिंदुत्वाशी नाळ कायम ठेवली.या पार्श्वभूमीवरच योगगुरू रामदेवबाबा यांनी एकनाथजींवर *हिंदूधर्माचे गौरवपुरुष* म्हणून स्तुतीसुमने वाहिली.वास्तवात हीच खरी त्यांच्या सामाजिक कार्याची पावती आहे.

*समृद्धी महामार्ग हा ड्रीम प्रोजेक्ट* सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने शिंदेसाहेबांनी या प्रकल्पाची उभारणी जलदगतीने व्हावी,या उद्देशाने अधिक लक्ष घातले.यावर सुमारे ५५ हजार कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित असल्याचे शासकीय स्तरावर सांगण्यात आले.त्याची परिणिती म्हणजे १० जिल्हे,२६,तालुके अन् ३९३ खेडींची दळणवळणाची मोठी सोय झाली आहे.हा प्रोजेक्ट राज्यातील लोकांना वरदान ठरला आहे.त्यामुळे अवघ्या ८ तासात मुंबई-नागपूर अंतर पार करता येऊ लागले. त्यास वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले. वास्तवात हीच खरी ना.एकनाथ शिंदेसाहेबांच्या कारकिर्दीची विकासगाथा होय.

शिंदे सरकारचा सर्वात महत्वाकांक्षी निर्णय म्हणजे स्त्रियांना वयाची अट न ठेवता,एस टी बसने अर्ध्या तिकीटावर प्रवास सवलत तर,७५ प्रस्थापित केला आहे,असे अभिमानाने म्हणावे लागेल.याशिवाय *हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना* या उपक्रमाअंतर्गत राज्यात शेकडों दवाखाने सुरू झाले आहेत.ठाणे-मुंबई जिल्ह्यात आज शेकडो आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत.त्याचा आजमितीपर्यंत लाखों लोकांनी लाभ घेतला आहे.त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत असंख्य गोरगरीब लोकांना महागडे ऑपरेशन करण्यास अर्थसहाय्य प्राप्त झालं अन आजही होत आहे.म्हणूनच त्यांना *अनाथांचे नाथ एकनाथ* म्हणतात.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कोरोना काळात रुग्णांची ने-आण करणं सुकर व्हावं,या उद्देशाने डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्यावतीने राज्यात सुमारे ३००

रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले.खऱ्या अर्थाने ही आरोग्य क्षेत्रातली क्रांतीच म्हणावी.वेळीच रुग्णांना हॉस्पिटलमध्ये पोहोचविल्याने त्यांचे प्राण वाचविण्याचं मोठं पुण्यकर्म शिंदे पिता-पुत्राने केलं,या गोष्टीची देशपातळीवर मोठी प्रशंसा झाली.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन,आरोग्यदूत फाउंडेशन तथा रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या *षष्ठ्यब्धि* निमित्त मागील वर्षी राज्यात *एकनाथ हिरक आरोग्य वर्ष* साजरा केलं गेलं.अत: या वर्षादरम्यान ६०० लहान मुलांच्या हृदयावर मोफत शस्त्रक्रिया;६०० दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप;६० महाआरोग्य शिबिराचे आयोजन;६० हजार नागरिकांचे मोफत आरोग्य तपासणी; ६० हजार नागरिकांना मोफत चष्मे वाटप; ६० हजार नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया; ६० हजार किलोमीटरची आरोग्य संपदा यात्रा; ६० हजार वृक्षांची लागवड आणि ६० हजार रक्तपिशवींचे संकलन संकल्प हे उपक्रम राबविण्यात आले होते. महत्वाचे म्हणजे आजमितीपर्यंत ६००० हून अधिक गोरगरीब मुला-मुलींचे हे हृदयाच्या छिद्राचे ऑपरेशन यशस्वी झाले आहेत.हा आरोग्य सेवेतील एक विक्रमच म्हणावा.

ना.एकनाथजी शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत *मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण* ही महत्त्वाकांक्षी योजना राबवत राज्यातील सर्वधर्मीय महिलांना माहे १५०० रुपये अर्थसहाय्य देऊन त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग दाखविला.सदर अर्थसहाय्याच्या मदतीने राज्यातल्या माता-भगिनी छोटाखानी उद्योग करून स्वतःच्या पायावर उभ्या राहू राहिल्या.राज्यातील





आहेत,म्हणजे हीच खरी स्व.दिघेसाहेबांना मानवंदना होय.महाराष्ट्र-बेळगाव प्रश्नाचे गांभीर्य पहाता,त्यांची समन्वयक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.सदर आंदोलनाचे नेतृत्व करतेवेळी त्यांनी बेल्लारी तुरुंगात ४ महिने कारावास भोगला.त्यांच्या संयम,साहस व संघर्षाचे हे प्रतिक होय.

म्हणतात ना," हर कामियाब इंसान के पीछे औरत का हाथ होता है" हे विधान शिंदेसाहेबांच्या बाबतीत तंतोतंत खरं ठरलं आहे.शिंदेसाहेबांच्या पत्नी सौ.

लताताई शिंदे ह्या सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहून त्यांच्या सुख-दुःखाच्या वाटेकरी राहिल्या आहेत.आपल्या पोटच्या दोन मुलांचा अपघाती मृत्यू झाल्या प्रसंगी त्या शिंदेसाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या.त्यांना मोठा मानसिक आधार देऊन लताताईंनी त्यांचे मनोबल ढळू दिले नाही. त्यामुळे लताताई ह्या जणू शिंदेसाहेबांच्या सावलीच

वर्षांवरील वृद्धांना एस.टी.प्रवास मोफत करण्याची मुभा दिल्याने त्यांना तीर्थयात्रा करणं सुकर झालं आहे.त्याची परिणिती म्हणजे स्त्रिया अन् ज्येष्ठ नागरिकांची एस.टी.ने प्रवास करणाऱ्यांची संख्या अनेक पटीने वाढली आहे.यास्तव विविध संघटना/सेवाभावी संस्थांनी शिंदेसाहेबांना धन्यवाद दिले आहेत.

ठाणे शहरातील धोकादायक अन् मोडकळीस आलेल्या इमारतींतल्या लोकांचे जीवन सुरक्षित करून त्यांना त्यांच्या हक्काचे घर देण्यासाठी नगर विकास मंत्री या नात्याने त्यांच्या प्रयत्नांतून *क्लस्टर डेव्हलपमेंट योजना* कार्यान्वित करण्यात आली. त्यासाठी सिडको व ठाणे महापालिका यांच्यात सामंजस्य करारही झाला.गेली दोन दशके क्लस्टर योजनेसाठी जो लढा दिला,त्याची ही फलश्रुती आहे.या महत्वाकांक्षी योजनेमुळे सुमारे ८ ते १० लाख ठाणेकरांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळून,त्यांच्या स्वप्नातील घर मिळणे साकार होत आहे.कृतज्ञतेच्या भावनेतून येथील रहिवाश्यांनी अनाथांचे नाथ एकनाथ यांचे शतशः आभार मानले.

माननीय एकनाथजी शिंदे हे जनमानसात खऱ्या अर्थाने *देवदूत* म्हणवले जातात. कारण राज्यात कोठेही नैसर्गिक आपत्ती आली वा अपघात झाला,तेथे ते देवदूतासारखे धावून जातात.विशेष म्हणजे ते गोरगरीब लोकांच्या आरोग्याचे रक्षणकर्ते आहेत.

ना.एकनाथजी शिंदे यांनी आपल्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून ६०,००० हून अधिक गोरगरीब,निर्धन,गरजू लोकांच्या महागड्या शस्त्रक्रियेंसाठी ४५० कोटींचे अर्थसहाय्य अदा केलं,ही अद्वितीय व अतुलनीय गोष्ट असून,आरोग्य क्षेत्रात एक विक्रम

सुमारे २ कोटी ४१ लाख एवढ्या गोरगरीब,गरजू,पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळाला.यास्तव भगिनींनी शिंदेसाहेबांना भाऊरायाची उपमा देऊन त्यांचे मन:पूर्वक आभार मानत,त्यांना बहिणीच्या नात्याने भरभरून राख्या बांधल्या.यालाच खऱ्या अर्थानं राजकारणातून समाजकारण करणं म्हणतात.त्यामुळेच ते जनमानसात गोरगरीब,निर्धन माता-भगिनींचे आधारवड म्हटले गेले आहेत.

माननीय शिंदेसाहेबांच्या प्रयत्नातून वारकरी मंडळांना वार्षिक 20 हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात सुरुवात झाली आहे.ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तीर्थ यात्रा करण्यासंदर्भात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.याबद्दल वारकरी संस्थांकडून शिंदेसाहेबांचे मनस्वी आभार मानण्यात आले. उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांना समस्त वारकरी संस्थांतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!आपले राजकीय,सामाजिक कौटुंबिक जीवन अधिकाधिक उज्ज्वल,सुखी समृद्ध होवो,हीच सदिच्छा.आपणास आरोग्यदायी असं दीर्घायुष्य लाभो,ही आई जगदंबे चरणी प्रार्थना!

आदरणीय शिंदेसाहेबांसाठी ह्या खास दोन ओळी,*तू न थकेगा कभी..तू न रुकेगा कभी..तू न झुकेगा कभी,तू न पिछे हटेगा कभी*,
*कर शपथ..कर शपथ,अग्निपथ..अग्निपथ*
जय हिंद !
जयहाराष्ट्र!

**लेखक - रणवीर राजपूत**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष/डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन,महाराष्ट्र राज्य*

---

नेतृत्व • कर्तृत्व • दातृत्व

महाराष्ट्राच्या मातीत संघर्षाची बीजं पेरून, कष्टांच्या घामातून जे नेतृत्व घडतं—तेच खरं लोकनेतृत्व. सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले, जनतेच्या दुःखाशी स्वतःचं दुःख समजणारे आणि "काम हाच माझा परिचय" या विचारावर ठाम उभे राहिलेले नेतृत्व म्हणजेच मा. ना. एकनाथ शिंदे.

सत्ता नव्हे, सेवा—हाच त्यांचा जीवन मार्ग

शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या महाराष्ट्रभूमीत अनेक नेते आले-गेले. मात्र जनतेच्या मनात कायम घर करणारे नेते मोजकेच असतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची सेवाव्रताची शिकवण या संस्कारांवर घडलेले मा. ना. एकनाथ शिंदे यांनी सत्तेला कधीच साधन मानले नाही—ती त्यांनी मानव सेवेची संधी मानली.

नगरसेवक-आमदार-मंत्री ते मुख्यमंत्री व आता उपमुख्यमंत्री—प्रत्येक जबाबदारीत त्यांनी एकच भूमिका ठेवली: निर्णय तत्काळ, मदत तातडीची आणि संवेदना मनापासून. संकटाच्या क्षणी फोन उचलणारा, रात्री-अपरात्री घटनास्थळी पोहोचणारा नेता म्हणूनच ते ओळखले जातात.

"रुग्ण फाईल नाही—तो जिवंत माणूस आहे"

आरोग्य क्षेत्रात त्यांनी मानवी दृष्टिकोन रुजवला. परवडणारे उपचार, मोफत वैद्यकीय सुविधा, आपत्कालीन मदत आणि उपचार खर्चासाठी थेट सहाय्य—या सगळ्यामागे एकच भावना होती: गरिबाचा जीव मौल्यवान आहे. प्रशासनाला संवेदनशील बनवण्याचं धाडस त्यांनी दाखवलं.

संकटात सर्वसाधारण वर्गाची ढाल बनणारे नेतृत्व

आपत्ती, दुर्घटना, पूर, आग, अपघात—अशा प्रत्येक प्रसंगी फक्त आदेश देणारे नव्हे, तर स्वतः पुढे उभे राहणारे नेतृत्व म्हणून मा. ना. एकनाथ शिंदे ओळखले जातात. गोरगरीब, वंचित, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्या डोळ्यातील भीती कमी करणारा विश्वास म्हणजेच ते.

'लाडकी बहीण'—नुसती योजना नव्हे तर दृढ़ विश्वासाचं नातं

'लाडकी बहीण योजना' ही आकड्यांची नव्हे, तर भावनांची योजना ठरली. महिलांच्या सन्मानासाठी, आत्मनिर्भरतेसाठी उचललेलं हे पाऊल महाराष्ट्रातील लाखो भगिनींच्या आयुष्यात आशेचा प्रकाश घेऊन आलं. म्हणूनच महिलांनी त्यांना प्रेमानं दिलेली "लाडका भाऊ" ही ओळख कोणत्याही पदापेक्षा मोठी आहे.

विकास जो प्रत्यक्षात दिसतो, जनतेला जाणवतो

केंद्र सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्रात पायाभूत सुविधांना नवी गती मिळाली. रस्ते, मेट्रो, पूल, गृहनिर्माण, औद्योगिक गुंतवणूक—हा विकास कागदावर नाही, तर जनतेच्या दैनंदिन जीवनात जाणवणारा आहे. मुंबई व MMR मध्ये "वेळ व इंधन वाचवणारी, सुरक्षित आणि आधुनिक" शहरे आकार घेत आहेत.

सामान्य कार्यकर्ता—त्यांचा खरा आत्मिक आधार

मा. ना. एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व फक्त सत्तेवर उभे नाही, तर तळागाळातील शिवसैनिकांच्या विश्वासावर उभे आहे. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेणं, त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहणं—ही त्यांची खरी ओळख आहे.

उद्याचा महाराष्ट्र-आजची विकासाची दिशा

स्टार्टअप्स, रोजगारनिर्मिती, हरित ऊर्जा, स्मार्ट शहरे आणि डिजिटल प्रशासन—या माध्यमातून महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य राज्य बनवण्याची स्पष्ट दिशा त्यांच्या नेतृत्वात दिसते.

जनतेच्या मनात विश्वासाने घर करणारे मायेचे व जिव्हाळ्याचे नेतृत्व

साधेपणा, संवेदनशीलता, तत्काळ निर्णय आणि संकटसमयी पुढाकार—या गुणांमुळे मा. ना. एकनाथ शिंदे हे सामान्य गोरगरीब जनतेचे नेते, लाडक्या भगिनींचे लाडके भाऊ आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांवर जीवापलिकडे प्रेम करणारे विश्वासू आधारस्तंभ बनले आहेत.

९ फेब्रुवारी रोजी येणाऱ्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त

मा. ना. एकनाथ शिंदे साहेबांना कोटी-कोटी शुभेच्छा.

त्यांचे आरोग्य उत्तम राहो, आयुष्य दीर्घायुषी होवो

आणि त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अधिक समृद्ध,

सशक्त आणि प्रगत होवो—हीच मनःपूर्वक सदिच्छा

**— दिनेश शिंदे**
**मिडिया समन्वयक,**
**शिवसेना**




# जनतेच्या हृदयातून उभा राहिलेला लोककल्याणकारी विकासदृष्टीचा तेजस्वी सुर्य – एकनाथराव शिंदे

ठाणे, सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ वर्ष : १४, अंक : २८३ पाने : १६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

## चंद्रपुरात भाजपचाच महापौर होणार

चंद्रपूर : चंद्रपूर पालिकेतील 66 जागांपैकी सर्वाधिक 27 जागांवर काँग्रेसने विजय मिळवला आहे. मात्र सत्ता स्थापन करण्यासाठी 34 जागांची आवश्यकता असताना काँग्रेसमध्ये दोन गट पडले. महत्त्वाचे म्हणजे खासदार प्रतिभा धानोरकर आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार या दोन्ही नेत्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी चार बैठका घेतल्या होत्या. मात्र तरीही दोन्ही नेत्यांमधील तिढा न सुटल्याने काँग्रेस सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांना यात हस्तक्षेप करावा लागला.









# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## संघ, भाजपाचे अच्छे दिन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, संघाची भूमिका, विचारसरणी आणि राजकारणाशी असलेले संबंध याबाबत देशभरात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुंबईतील वरळी येथील नेहरू सेंटरमध्ये संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज या विषयावर केलेले भाष्य केवळ संघाचा आत्मपरिचय देणारे नव्हते, तर भाजप–संघ नातेसंबंधांवर स्पष्ट, परखड आणि काही बाबतीत धूसर भूमिका अधोरेखित करणारे ठरले. भागवत यांचे सर्वात लक्षवेधी विधान म्हणजे, भाजप सत्तेत असल्यामुळे संघाला अच्छे दिन नाहीत, उलट संघामुळे भाजपला अच्छे दिन आले आहेत. हे विधान अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. गेल्या दशकभरात सत्तेत असलेल्या भाजपला संघाची वैचारिक, संघटनात्मक आणि कार्यकर्त्यांची ताकद कशी लाभली, हे यामुळे अधोरेखित होते. मात्र, त्याच वेळी संघ स्वतःला सत्तेपासून अलिप्त ठेवत असल्याचा दावा पुन्हा एकदा मांडण्यात आला. भागवत यांनी स्पष्ट केले की, भाजप, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, मजदूर संघ, किसान संघ या सर्व संघप्रणित संघटना असल्या तरी त्या संघाच्या शाखा नव्हेत. त्या स्वायत्त, स्वतंत्र आणि स्वावलंबी आहेत. संघ त्यांच्यावर कोणताही थेट दबाव टाकत नाही. मात्र, या विधानातील विरोधाभास सहज लक्षात येतो. संघातून गेलेले कार्यकर्ते या सर्व संघटनांत प्रभावी भूमिकेत आहेत, हे नाकारता येत नाही. त्यामुळे निर्णयप्रक्रियेत संघविचाराचा प्रभाव असतो, हे वास्तवही नजरेआड करता येत नाही. भागवत यांचे आणखी एक महत्त्वाचे विधान म्हणजे पुण्य त्यांचे, पापात थोडा वाटा आमचा. संघप्रणित संघटनांनी केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय त्या संघटनांचे असते, मात्र गैरप्रकार, भ्रष्टाचार किंवा चुकीच्या निर्णयांत संघातून गेलेले कार्यकर्ते सामील असतील, तर त्याची नैतिक जबाबदारी संघ स्वीकारतो, असे त्यांनी सांगितले. हे विधान प्रामाणिक वाटले तरी त्यामागे संघ स्वतः वर कोणतीही थेट राजकीय जबाबदारी येऊ नये, याची खबरदारी घेत असल्याचेही स्पष्ट होते.

भाजपमध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपाखालील, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांना प्रवेश दिला जात असताना संघ त्यावर दबाव का टाकत नाही, या प्रश्नावर भागवत यांनी आम्ही कोणासाठी काम करत नाही. आमची नीती स्वीकारणाऱ्यांना लाभ होतो असे उत्तर दिले. ही भूमिका संघाच्या तत्त्वनिष्ठतेचा दावा करते, पण व्यवहारात भाजपमध्ये सुरू असलेल्या तडजोडीच्या राजकारणावर थेट टीका टाळते. राजकारण सिद्धांतावर चालावे, असे संघाचे मत असल्याचे भागवत सांगतात. मात्र, आजचे राजकारण मतांसाठी, जाती–धर्माच्या गणितांसाठी चालते, हेही त्यांनी मान्य केले. मात्र, या समस्येचे खापर त्यांनी समाजावर फोडले. मतदार जातीपातीचा विचार करतात, म्हणून राजकारणी करतात असे म्हणत, राजकीय पक्षांची जबाबदारी काहीशी झटकली गेली. येथेच प्रश्न उपस्थित होतो, जर समाज चुकीच्या दिशेने जात असेल, तर त्याला योग्य दिशा देण्याची जबाबदारी कोणाची ? संघ स्वतःला सांस्कृतिक संघटना म्हणवतो, मग समाजातील नैतिक अधःपतनावर ठोस भूमिका मांडण्याचे धाडस का दाखवले जात नाही ? हा प्रश्न नेहमीच अनुत्तरीत राहणारा आहे.

भागवत यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर तुलनेने स्पष्ट भूमिका मांडली. राज्यघटनेने दिलेले आरक्षण योग्य असल्याचे सांगत, ऐतिहासिक अन्याय सहन केलेल्या समाजासाठी आरक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. इतर समाजाने थोडा त्याग करावा, असेही ते म्हणाले. मात्र, आरक्षण कायमस्वरूपी नसावे हा संघाचा पारंपरिक दृष्टिकोन त्यांनी अप्रत्यक्षपणे पुन्हा मांडला. जेव्हा आरक्षण लाभार्थी स्वतः सांगतील की आता आरक्षणाची गरज नाही, तेव्हा तो टप्पा येईल असे म्हणत त्यांनी हा प्रश्न भविष्यात ढकलला. संघाच्या सर्वोच्च पदावर अनुसूचित जाती–जमातीतील व्यक्ती येऊ शकतो का, या प्रश्नालाही त्यांनी सकारात्मक उत्तर दिले. संघात जन्म, जात, धर्म यावरून कोणालाही रोखले जात नाही, असा दावा त्यांनी केला. मात्र, प्रत्यक्षात संघाच्या सर्वोच्च नेतृत्वात सामाजिक विविधता कितपत आहे, हा प्रश्न कायम उपस्थित होत असल्यास नवल नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न देण्याच्या मागणीला भागवत यांनी ठाम समर्थन दिले. सावरकरांना भारतरत्न दिल्यास पुरस्काराचाच गौरव होईल, असे सांगत त्यांनी आपली वैचारिक निष्ठा पुन्हा अधोरेखित केली. मात्र, सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती असलेल्या वादांवर, किंवा समाजात निर्माण झालेल्या मतभेदांवर त्यांनी काहीही भाष्य केले नाही. या संपूर्ण भाषणातील सर्वात ठळक बाब म्हणजे काही मुद्द्यांवरील मौन. देशात केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून विरोधकांवर दबाव टाकला जात असल्याचे आरोप, राजकीय सूडबुद्धीने कारवाया होत असल्याची टीका, लोकशाही संस्थांची स्वायत्तता कमी होत असल्याचे आरोप या सर्व विषयांवर सरसंघचालकांनी काहीही भाष्य केले नाही. संघ लोकशाही, संविधान आणि राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करतो, असा दावा करतो, मग या मुद्द्यांवर मौन का ? भागवत यांनी सिद्धांतहीन राजकारण चालते, म्हणून राजकीय पक्ष ते करतात असे निरीक्षण नोंदवले. मात्र, आज भाजपकडून सुरू असलेल्या तडजोडीच्या राजकारणावर, वैचारिक विसंगतींवर किंवा सत्तेसाठी करण्यात येणाऱ्या युती–समर्थनांवर थेट भाष्य करण्याचे धाडस त्यांनी केले नाही. भाजप जातीपाती, धर्मद्वेष संपविण्यासाठी पुढाकार घेईल, असे ठामपणे सांगणेही त्यांनी टाळले.

# प्रशासकीय काळातील कामकाजाची विविध विषय समित्या गठीत करण्याची सूचना

नवी मुंबई - नवी मुंबई महापालिका हद्दीतील गाव गावठाण आणि इतर सर्व गरजे पोटीच्या घरांना लावण्यात आलेली जाचक शास्ती रद्द करण्याची सूचना वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि गटनेत्यांना दिल्या आहेत. त्याचबरोबर मागील पाच ते सहा वर्षांमध्ये महापालिका प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती गठीत करण्याची सूचना देखील दिली आहे.

वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी आज नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, माजी महापौर आणि विद्यमान गटनेते सागर नाईक यांची बैठक घेतली. या बैठकीस माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक त्याचबरोबर माजी आमदार संदीप नाईक हे देखील उपस्थित होते.

नामदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले असून 5 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये महापौरपदी सुजाता पाटील आणि उपमहापौरपदी दशरथ भगत यांची बिनविरोध निवड झालेली आहे. या निवडीनंतर लगेचच जनहिताच्या आणि शहरी विकासाच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे निर्देश नामदार नाईक यांनी पालिका पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. नवी मुंबईमध्ये गाव, गावठाण तसेच इतर गरजेपोटीची घरे बांधण्यात आली आहेत. त्याला प्रशासनाने तिप्पट शास्ती आकारली आहे. ही शास्ती रद्द करण्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेमध्ये विषय घेण्यात येणार आहेत. लोकप्रतिनिधी सभागृह अस्तित्वात येण्यापूर्वी मागील पाच ते सहा वर्षांमध्ये नवी मुंबईत प्रशासकीय कारभार होता. या कारभाराविषयी अनेक आक्षेप नोंदवले गेले आहेत. या संदर्भात या कामकाजाची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी एक श्वेतपत्रिका काढण्यासाठी देखील उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येणार आहे. मार्च महिन्यामध्ये महापालिकेचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. नामदार गणेश नाईक यांनी शब्द दिल्याप्रमाणे मागील २५ वर्षे नवी मुंबईमध्ये कोणत्याही प्रकारची मालमत्ता कर किंवा पाणीपट्टी वाढ करण्यात आलेली नाही. भविष्यात देखील मालमत्ता कर किंवा पाणीपट्टी वाढविण्यात येणार नाही, असा शब्द नामदार गणेश नाईक यांनी नवी मुंबईच्या जनतेला दिलेला आहे.



करवाढ न करण्याच्या दृष्टीने देखील कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा, ठोक मानधन कामगारांचे विषय, अन्य कर्मचारी आणि कामगारांचे विविध प्रलंबित प्रश्न असे विषय येत्या महापालिकांच्या सर्व साधारण सभांमध्ये मार्गी लावण्यात येणार आहेत. महापालिकेच्या विविध विषय समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

# येत्या आठवड्यात शेअर बाजारात तेजी की मंदी?

## 3 फॅक्टर ठरवणार मार्केटची दिशा

मुंबई: शेअर बाजारात गेल्या आठवड्यात तेजी पाहायला मिळाली. भारत-अमेरिका व्यापार करारानंतर शेअर बाजारात आनंदाची लाट दिसू आली. आता सोमवारपासून सुरू होणाऱ्या आठवड्यासाठी काही घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. ज्याचा थेट परिणाम शेअर बाजारवर होताना दिसून येईल. गुंतवणूकदारांचेही यावर लक्ष असणार आहे.

गेल्या आठवड्यात सेन्सेक्समधील टॉप-10 कंपन्यांपैकी आठ कंपन्यांना मोठा फायदा झाला. या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांची संपत्ती एकत्रितपणे 4.55 लाख कोटी रुपयांनी वाढली. या काळात बीएसई सेन्सेक्स निर्देशांक 3.53 टक्क्यांनी म्हणजेच 2,857.46 अंकांनी नी वाढला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी 3.49 टक्क्यांनी आणि 868.25 अंकांनी वधारला. सर्वाधिक कमाई करणाऱ्या कंपन्यांमध्ये मुकेश अंबानींची रिलायन्स इंडस्ट्रीज आघाडीवर होती, गेल्या आठवड्यात रिलायन्सच्या गुंतवणूकदारांनी 1.41 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा कमावला.आता 9 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आठवड्याबद्दल बोलायचे झाल्यास, अनेक महत्त्वाचे आकडेवारी आणि घटक बाजाराची दिशा ठरवणार आहेत.

**तिमाही निकालांचा प्रभाव:** भारतीय शेअर बाजारात सूचीबद्ध कंपन्यांचे तिमाही निकाल येण्याचे सत्र सुरूच आहे आणि पुढील आठवड्यातही अनेक मोठ्या कंपन्यांचे तिसऱ्या तिमाहीचे निकाल अपेक्षित आहेत.

# मिरा भाईंदर येथे जिल्हास्तरीय लाठी स्पर्धेचे आयोजन

भाईंदर ( प्रतिनिधी ) -काल, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मिरा भाईंदर जिल्हा लाठी असोसिएशन ( शिव शंभो मर्दानी आखाडा या महाराष्ट्र राज्य संचलित दिवंगत महादेव व्यायाम शाळा यांचे वस्ताद् सुधीर गणपत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरीय लाठी काठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेसाठी शिवशंभो मर्दानी आखाडा, शाखा मिरा भाईंदर शाखा मुंबई सेंट्रल, शाखा बोरिवली या शाखांमधील अनेक खेळाडूंनी सहभाग घेऊन एकम् लाठी आणि द्वे लाठी प्रथम आणि द्वितीय क्रमांकावर विजयी होऊन प्राविण्य मिळवले. यासोबत या जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी लाठी असोसिएशन महाराष्ट्र महागुरू सुभाष मोहिते , सचिव हितेश मांडरे या सोबत कमांडो प्रशांत नगरसेवक सचिन डोंगरे, मराठी एकीकरण समिती अध्यक्ष गोवर्धन देशमुख, प्रमोद पार्टे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पाटील, समाजसेवक रथीन दत्ता, साई स्पोर्ट्स वायंगणकर संस्थापक राकेश वायंगणकर, पत्रकार भालचंद्र कांबळी अशा अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून स्पर्धेतील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिव शंभो मर्दानी आखाडा शाखा मिरा भाईंदर, शाखा मुंबई सेंट्रल, शाखा बोरिवली या खेळाडूंनी या जिल्हा स्तरीय स्पर्धेत प्रथम द्वितीय क्रमांकावर विजय मिळवून प्राविण्य मिळवले. यावेळी शिवशंभो मर्दानी आखाडा परिवाराच्या अध्यक्षा प्रियंका कदम यांनी सूत्रसंचालन केले तसेच संजय तांबे आणि निशा नाकती यांनी सर्व सहभागी स्पर्धकांना जेवण आणि फराळ यांची सोय केली अशा रीतीने परिवारातील सदस्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडून स्पर्धक आणि उपस्थिती मान्यवर यांचा उत्साह वाढविला.



## 'कायद्याने ठोकून काढू!

**(पान 1 वरून )'पुढील पाच वर्षे औद्योगिक वीज दरात वाढ नाही' -** मुख्यमंत्री म्हणाले की, पुढील पाच वर्षे औद्योगिक विजेचे दर वाढणार नाहीत; उलट ते कसे कमी होतील यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यावरही भर दिला जात आहे.

## भाजप सरकार चालवते, ... कामात हस्तक्षेप करत नाही

काही देणेघेणे नाही, असा विचार न करता समाजाने सक्रिय आणि सजग राहिले पाहिजे, असे ते म्हणाले. यूकेमध्ये 1 लाख हिंदूंच्या संमेलनासाठी फक्त 80 पोलीस होते, कारण तिथे स्वयंशिस्त होती. याउलट तिथल्याच फुटबॉल मॅचेसमध्ये 8 हजार पोलीस असूनही दंगली होतात, असे ते म्हणाले.

## मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या? विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर काय परिणाम होणार?

**(पान 1 वरून )** व्यावसायिक, पोलीस, सैनिक, गृहिणी, शिक्षक, कामगार अशा समाजातील विविध घटकांतील आहेत. या परिक्षेमध्ये विविध विषय मिळून ६ लाख ७९ हजार ९५४ उत्तरपत्रिका लिहिल्या जाणार आहेत.

'नर्सिंग'ला अल्प प्रतिसाद - राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी सेल) तब्बल चार महिने चाललेल्या बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अखेर संपली असून, राज्यात बी. एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या ५ हजार ५७३ जागा रिक्त राहिल्या आहेत. या अभ्यासक्रमाच्या १० हजार ९५७ जागांवर विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

सीईटी सेलमार्फत जुलै महिन्यात बी. एस्सी. नर्सिंगच्या प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी सुरू केली होती. चार नियमित फेऱ्या आणि तीन संस्थास्तरीय फेऱ्यांच्या माध्यमातून ऑगस्ट ते डिसेंबर, अशी तब्बल पाच महिने ही प्रवेश प्रक्रिया सुरू होती. इतका दीर्घ काळ ही प्रक्रिया राबवूनही, राज्यात बी. एस्सी. नर्सिंगच्या ५ हजार ५७३ जागा रिक्त राहिल्या आहेत. राज्यात बी. एस्सी, नर्सिंग अभ्यासक्रम राबविणारी एकूण २९४ महाविद्यालये आहेत. त्यापैकी १७ सरकारी तर २७७खासगी महाविद्यालये आहेत. सरकारी महाविद्यालयांमध्ये पहिल्या वर्षाच्या १ हजार १८०, तर खासगी महाविद्यालयात १५ हजार ३५० जागा उपलब्ध आहेत. यापैकी १० हजार ९५७ जागांवर विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत.

# निसर्ग संवर्धनासाठी 'माझा १ रुपया निसर्गासाठी' उपक्रम, निसर्गासाठी आपली जबाबदारीची जाणीव

टिटवाळा - उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाई, वाढते तापमान आणि त्यामुळे पक्षी व इतर व जीवसृष्टीसमोर निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता, योगदान फाउंडेशन ट्रस्ट तर्फे माझा ₹1 निसर्गासाठी' या लोकसहभाग उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक व्यक्तीने फक्त ₹1 योगदान देऊन निसर्ग संवर्धनासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सध्याच्या काळात निसर्ग संरक्षणासाठी मोठ्या देणग्यांपेक्षा सामूहिक सहभाग अधिक प्रभावी ठरतो या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येकासाठी सहज शक्य असलेले ₹1 योगदान हे या मोहिमेचे वैशिष्ट्य असून, कोणताही आर्थिक बोजा न पडता प्रत्येक नागरिकाला निसर्गासाठी आपली जबाबदारी पार पाडण्याची संधी या माध्यमातून मिळत आहे.

या उपक्रमांतर्गत जमा होणाऱ्या योगदानातून पक्ष्यांसाठी पाणपोई उभारणे, वृक्षरोपण करणे, पक्ष्यांसाठी प्राथमिक उपचार केंद्र सुरू करणे, तसेच निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृती करणे., असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात पाण्याअभावी होणारे पक्ष्यांचे हाल कमी करण्यावर या मोहिमेचा भर राहणार आहे.

योगदान फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष मदन मोहन चव्हाणयांनी सांगितले की,

"₹1 ही केवळ रक्कम नसून निसर्गासाठी दिलेला सहभाग आहे. मोठ्या योगदानाची अपेक्षा न ठेवता, सामान्य माणसालाच या चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे."

या उपक्रमाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन ही केवळ संस्था किंवा शासनाची जबाबदारी नसून, समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.




नागरिकांनी या लोकसहभाग उपक्रमात सहभागी होऊन 'माझा ₹1 निसर्गासाठी' या संकल्पनेला पाठबळ द्यावे, असे आवाहन योगदान फाउंडेशन ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

# भिवंडीत गादी व पेपर रोलच्या गोदामाला भीषण आग, आगीत दहा ते बारा गोदामं जळून खाक

भिवंडी- भिवंडी तालुक्यातील मानकोली येथील हरिहर कंपाऊंड परिसरात गादी व पेपर रोलच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत 10 ते 12 गोदामे जळून खाक झाली आहेत. शॉर्टसर्किटने आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. पहिला मजला व दुसरा मजला आगीच्या भक्षस्थानी आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी भिवंडी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.

भिवंडी तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. मानकोली येथील हरिहर कंपाऊंड परिसरात गादी व पेपर रोलच्या गोदामाला भीषण आग लागली आहे. यामुळं तीन ते चार गोदामे जळून खाक झाली आहे. यामुळं मोठं नुकसान झालं आहे. शॉर्टसर्किटने



आग लागल्याची माहिती मिळत आहे. अग्निशामक दल्याच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. टोरंट पावर या वीज वितरण कंपनीला माहिती दिल्यानंतर त्यांना पोहोचण्यास उशीर झाला आणि तोपर्यंत ही आग मोठ्या प्रमाणात पसरली व या आगीत सुमारे 10 ते 12 गोदाम पूर्णतः जळून खाक झाली असून इमारतींच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यालाही आगीचा मोठा फटका बसला आहे. आगीची तीव्रता लक्षात घेता भिवंडी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. आग पूर्णपणे कधी नियंत्रणात येते याकडे लक्ष लागले असून अग्निशमन दलाच्या जवानांकडून शर्तीचे प्रयत्न सुरू आहे

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **MEENAKSHI GUNJAN UKIL** TO **MEENAKSHI CHAKRABORTY UKIL** AS PER AFFIDAVIT. RESIDING AT A/1006, SIMRAN SAPPHIRE, SECTOR 34C, NEAR SAI DEVELOPER, KHARGHAR, NAVI MUMBAI, MAHARASHTRA - 410210

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **GUNJAN AJIT UKIL** TO **GUNJAN UKIL** AS PER AFFIDAVIT. RESIDING AT A/1006, SIMRAN SAPPHIRE, SECTOR 34C, NEAR SAI DEVELOPER, KHARGHAR, NAVI MUMBAI, MAHARASHTRA - 410210

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा लेखाशिर्षका अंतर्गत पात्र आणि अनुभवी कंपन्यांकडून खालील कामांसाठी ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १. | कळवा प्रभाग समिती अंतर्गत वॉर्ड क्र. ९ जुना मुंबई पुणे येथील रस्त्यावरील गतिरोधक व थर्माप्लास्टिक पट्टी मारणे |
| २. | कळवा प्रभाग समिती अंतर्गत वॉर्ड क्र. ९ राजदीप हॉटेल ते पद्यावती हायस्कुल येथे गटार व पायवाट करणे |
| ३. | कळवा प्रभाग समिती अंतर्गत वॉर्ड क्र. ९ पारसिक रेतीबंदर येथील रघुकुल सोसायटी परिसरात पदपथ बांधणे |

ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिका इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.९.२.२०२६ ते दि.१६.२.२०२६ रोजीपर्यंत उपलब्ध असून, ऑनलाईन निविदा दि.१६.२.२०२६ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.१७.२.२०२६ रोजी सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/११६२/२०२५-२६ सही/-
दि:०६.०२.२०२६ उपनगरअभियंता
plsvisitourofficialweb-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील "मागासवर्गीय निधी" या लेखाशिर्षका अंतर्गत प्रभाग क्र. २४ गटार व पायवाट करणे अशा एकूण नऊ कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेत स्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि.९.२.२०२६ ते दि. १६.२.२०२६ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.१६.२.२०२६ रोजी १६.०० वाजता स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. १७.२.२०२६ रोजी १६.०० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-क.प्र.स/११६०/२०२५-२६ सही/-
दि.०६.०२.२०२६ कार्यकारी अभियंता
plsvisitourofficialweb-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

ठाणे, सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ वर्ष : १४, अंक : २८३, पाने : १६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे



अग्रलेख
**संघ, भाजपाचे अच्छे दिन**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, संघाची भूमिका, विचारसरणी आणि राजकारणाशी असलेले संबंध याबाबत देशभरात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली .....पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २३° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,५४,४२० | ३,००,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




# 'कायद्याने ठोकून काढू!

## औद्योगिक क्षेत्रातील गुंडशाही खपवून घेणार नाही'

**अहिल्यानगर: राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण वेगाने सुरू असताना औद्योगिक क्षेत्रातील झुंडशाही, गुंडशाही आणि उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्ती अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत. सुपा औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना त्रास देणारे काही वाईट उद्योग सुरू असल्याची माहिती मिळाली असून, अशा घटकांना कायद्याने ठोकून काढले जाईल, असा ठाम आणि स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी औद्योगिक प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.** (पान 4 वर )






■ 'पुढील पाच वर्षे औद्योगिक वीज दरात वाढ नाही'

### पोलीस प्रशासनाला कठोर कारवाईचे स्पष्ट निर्देश

कायद्याच्या अंमलबजावणीबाबत ठाम भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की औद्योगिक क्षेत्रातील अगदी छोटी घटना सुद्धा गंभीरपणे घेतली जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. कोणीही उद्योजकांना त्रास दिला तर कायद्याने ठोकून काढायचे. ठोकून काढू याचा अर्थ हिंसा नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत अत्यंत कठोर कारवाई असा आहे.

### 'उद्योजकांना धमकावणे आणि खंडणीचे प्रकार खपवून घेणार नाही'

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पारनेरसारख्या भागात नवे औद्योगिक इकोसिस्टिम उभे राहत असताना जसे चांगले लोक येतात, तसे काही वाईट लोकही तयार होतात. उद्योजकांना धमकावणे, अडथळे निर्माण करणे, खंडणीसारखे प्रकार करण्याचे प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी अशा लोकांचा बंदोबस्त केला असून, आता पुन्हा कोणी हिम्मत केली तर त्याला स्पेअर केले जाणार नाही. इज ऑफ डूइंग बिझनेस कॉस्ट ऑफ डूइंग बिझनेस आणि कायदा-सुव्यवस्था या तीन गोष्टी उद्योगाच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा

### 'झुंडशाही आणि दादागिरीवर सरकारचा अंकुश'

नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असल्यास त्यांनी अधिकृत नियामक यंत्रणेकडे दाद मागावी, असे आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, अनैतिक प्रथा असतील तर रेग्युलेटर कारवाई करेल; पण झुंडशाही, दादागिरी आणि गुंडगिरी महाराष्ट्रातील कोणत्याही एमआयडीसीत खपवून घेतली जाणार नाही. जोपर्यंत भरतसारखे प्रामाणिक उद्योजक आमच्यासोबत आहेत, तोपर्यंत महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**थोडक्यात घडामोडी**

### मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या? विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर काय परिणाम होणार?

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील १२१ शिक्षणक्रमांच्या हिवाळी परीक्षा आज, बुधवारपासून (दि. ७) सुरू होत आहेत. यापैकी ११, १४, १५ व १६ जानेवारीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत, असे विद्यापीठाने जाहीर केले आहे. या परीक्षा अनुक्रमे २२, २३, २४ व २५ जानेवारीला होणार आहेत.

विद्यापीठाच्या परीक्षा ३१ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांच्या सत्र व वार्षिक परीक्षा तसेच मे २०२५ च्या सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या फेरपरीक्षार्थींची लेखी परीक्षा होणार आहे. राज्यभरातील २६९ परीक्षा केंद्रांवर परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी १ लाख ४९ हजार ८७२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची वर्ग 'क' परीक्षा रविवारी (दि. ११) होणार आहे.

तसेच महापालिका सार्वत्रिक निवडणुकींअंतर्गत १५ जानेवारीला मतदान व १६ जानेवारीला मतमोजणी असणार आहे. त्यामुळे ११, १४, १५ व १६ जानेवारीला नियोजित विद्यापीठाच्या परीक्षा २२, २३, २४ व २५ जानेवारीला होणार आहेत. मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी नोकरदार, (पान4 वर )

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 100 वर्षे पूर्ण

# भाजप सरकार चालवते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांच्या कामात हस्तक्षेप करत नाही




**बांगलादेशात अजूनही सव्वा कोटी हिंदू आहेत. जर ते एकत्र आले, तर ते स्वतःच्या सुरक्षेसाठी तिथल्या राजकारणाचा उपयोग करू शकतात. सुदैवाने, यावेळी त्यांनी 'पळणार नाही, तिथेच राहून लढू' असा निर्णय घेतला आहे. तिथल्या हिंदूंना बळ देण्यासाठी आम्ही आमच्या मर्यादेत राहून जे काही शक्य आहे ते सर्व करू, याची खात्री मी देतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. आरएसएस व्याख्यानमालेत मोहन भागवत यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले.**

### अखंड भारत आणि 2047 चे स्वप्न

मोहन भागवत म्हणाले की, 2047 मध्ये भारत विभाजनाची भीती बाळगण्यापेक्षा 'अखंड भारताच्या' उदयाची कल्पना करा. जे 500 वर्षे बादशहा करू शकले नाहीत किंवा 200 वर्षे इंग्रज करू शकले नाहीत, ते आता स्वतंत्र भारतात का होईल? हे 1947 नाही, आता आपण खूप पुढे गेलो आहोत. भारताला तोडणारे स्वतःच तुटतील, पण भारत जोडला जाईल आणि हे आपण करून दाखवू. लोकसंख्येच्या बाबतीत तीन मुख्य कारणे असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या तीन-चार वर्षांपासून सरकार यावर प्रयत्न करत आहे आणि ते विफल होणार नाहीत, असे आम्हाला वाटते.

### संघ आणि सरकारवर काय म्हणाले?

मोहन भागवत म्हणाले की, आम्ही 'बॅक सीट ड्रायव्हिंग' करत नाही. जे लोक सरकारमध्ये आहेत तेच सरकार चालवतात, आम्ही नाही. आम्हाला जर काही चांगल्या आणि उपयुक्त गोष्टी माहीत झाल्या, तर आमचे स्वयंसेवक त्या तिथपर्यंत पोहोचवण्याचे काम करतात, त्यापलीकडे आम्ही जात नाही, असे त्यांनी सागंतिले.

### सामाजिक सजगता आणि सुरक्षा

भागवत म्हणाले की, घातपाताच्या घटना आणि वेडेपणा पूर्णपणे बंद होईल असे नाही, पण जर समाज सजग असेल, तर 90 टक्के नियंत्रण मिळवता येते. उरलेले 10 टक्के देवाच्या मर्जीवर असते. समाजाची सुरक्षा आणि तयारी ही सर्वात मोठी गरज आहे. समाजात अनुशासन (शिस्त) आणि आपुलकी असेल तरच व्यवस्था पक्की राहते. आपल्याला (पान 4 वर )

# तेलंगणात महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना





**महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ओबीसी नेते आणि मंत्री मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांकडे पत्र पाठवलं आहे. तेलंगणात सामाजिक विचारांवर हल्ला झाला असून या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्र्यांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.**

महात्मा फुले यांच्या पुतळा विटंबना प्रकरण केंद्रीय मंत्री अमित शाहांकडे तातडीच्या कारवाईची मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे. महात्मा फुले यांच्या पुतळ्यावर हल्ला म्हणजे सामाजिक समतेवरच घाला आहे, असेही छगन भुजबळ म्हणालेत. त्यामुळे या प्रकरणी नेमकी काय कारवाई केली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### महात्मा फुले देशाच्या अस्मिता, कारवाई करायलाच हवी

दुसरीकडे या प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. तेलंगणामध्ये जिथे कुठे ही घटना घडली असेल, अशा पद्धतीने महात्मा ज्योतिबा फुले



यांच्या पुतळ्याची विटंबनाची होणं ही घटना चुकीची आहे. महात्मा फुले देशाच्या अस्मिता आहेत. जे कोणते सरकार असेल त्या सरकारने चौकशी करायला हवी, भूषणवर कारवाई करायला हवी. पण कोशारय्यांना ज्या प्रकारे महात्मा फुलेंचा अपमान केला होता त्यावरही कारवाई व्हायला हवी. अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली आहे.

हज यात्रेसाठी जात असलेल्या भाविकांची स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात तपासणी केली जात होती. मात्र यावर्षीपासून आरोग्य विभागाने ऑनलाइन नोंदणीसाठी ॲप सुरू केले असून या ॲपचा पासवर्ड फक्त बीड जिल्हाशल्य चिकित्सकांकडेच देण्यात आला आहे. त्यामुळे अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयाने हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची वैद्यकीय तपासणी करण्यास असमर्थता दर्शविली आहे. अंबाजोगाई व परिसरातील हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांना बीड येथील जिल्हा रुग्णालयात जाणे गैरसोयीचे असल्याने सर्व सुविधा असलेल्या अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातच हज यात्रेकरूंची तपासणी दरवर्षीप्रमाणे करावी अशी मागणी केज मतदार संघाचे आमदार नमिता मुंदडा यांनी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्राद्वारे केली आहे.

# मुंबईत परदेशी शिक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक




**मुंबईत परदेशी शिक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक झाल्याच्या एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परदेशात उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पाठवणाऱ्या एका एजन्सीने डिसेंबर महिन्यात पालक आणि विद्यार्थ्यांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचं प्रकरण समोरं आलं आहे. चारकोप परिसरातील करिअर अँड ऑप्शन्स सर्व्हिस लिमिटेड या एजन्सीविरोधात चारकोप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यां प्रकरणात एजेन्सीचे मालक स्टेला मेहता आणि राकेश मेहता हे मुख्य आरोपी आहेत.**

### 19 जणांची मिळून 2 कोटी 87 लाख रुपयांची फसवणूक

या प्रकरणात सुरुवातीला 13 तक्रारदार होते. मात्र आता तक्रारदरांची संख्या 19 वर गेली असून फसवणूकीचा आकडा देखील वाढला आहे. आधी एकूण पावणे दोन कोटींची दिसणारी फसवणूक आता जवळपास तीन कोटींपर्यंत गेली आहे. या 19 जणांची मिळून 2 कोटी 87 लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. केवळ मुंबईच नाही तर नाशिकमधील एका विद्यार्थयांची देखील या दाम्पत्याने फसवणूक केल्याचं समोर आलं आहे.यातील आरोपी स्टेला मेहता आणि राकेश मेहता यांचा शोध सध्या पोलीस घेत असू दोघांनी ओरिसाला पळ काढल्याची माहिती सध्या समोर आली आहे. मात्र या फसवणुकीच्या प्रकारामुळे मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणी आता आरोपींचा शोध घेणे हे पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे. तर अशा फसवणुकीला बळी न पडता सावधगिरी बाळगावी, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

# ट्रम्प म्हणाले, भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल

**भारत आणि अमेरिका यांच्यात एका अंतरिम करारासाठीच्या आराखड्यावर सहमती झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कराराची घोषणा केली असून, यामुळे भविष्यात द्विपक्षीय व्यापार कराराचा मार्ग मोकळा होणार आहे. अमेरिकेने जारी केलेल्या कार्यकारी आदेशानुसार, भारताने रशियाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तेल आयात करणे थांबवण्याचे मान्य केले आहे. मात्र, भारताचे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी यावर थेट भाष्य करणे टाळले असून, परराष्ट्र मंत्रालय यावर माहिती देईल असे सांगितले आहे. दुसरीकडे, विरोधी पक्षाने (काँग्रेस) हा करार अमेरिकेच्या बाजूने झुकलेला असून यात पारदर्शकतेचा अभाव असल्याची टीका केली आहे.**




■ **याविषयी भारताचे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल आणि परराष्ट्र मंत्री जयशंकर यांच्या बोलण्यात अस्पष्टता**

### रशियन तेलाबाबत परराष्ट्र मंत्रालयाने नेमकं काय सांगितलं?

रशियाकडून तेल खरेदीबाबत प्रश्न विचारले असता, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं की याबाबतची माहिती परराष्ट्र मंत्रालयाकडे (MEA) असेल. त्याआधी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी असं म्हटलं होतं की, हा करार पियुष गोयलच करत होते, त्यामुळे त्यांनाच या व्यवहाराची अधिक माहिती आहे. यानंतर ६ फेब्रुवारीला, परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने पत्रकार परिषदेत स्पष्ट भूमिका मांडली. MEA ने सांगितलं की, भारतासाठी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 140 कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षितता. म्हणजेच देशाला पुरेसं इंधन (तेल, गॅस) मिळणं ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे.

### आयात शुल्कात कपात

दरम्यान, ऑगस्ट 2025 पासून भारतावर रशियन तेलामुळे 25 टक्के दंडात्मक शुल्क आणि 25 टक्के परस्पर शुल्क मिळून एकूण 50 टक्के आयात शुल्क होते. आता रशियन तेलाचा मुद्दा सुटल्याने हे शुल्क 25 टक्क्यांवर आले आहे आणि अंतरिम करार पूर्ण झाल्यावर ते 18 टक्क्यांपर्यंत कमी होणार आहे.

### अमेरिकेची ऊर्जा खरेदी

या करारानुसार, भारत पुढील 5 वर्षांत अमेरिकेकडून ऊर्जा उत्पादने, विमाने आणि विमानांचे सुटे भाग, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकिंग कोळसा मिळून 500 अब्ज डॉलर्सची खरेदी करणार आहे. अमेरिकन बाजारपेठेत भारतीय जेनेरिक औषधे, रत्ने आणि दागिने तसेच विमानांच्या भागांवर शून्य आयात शुल्क लागू होणार आहे, ज्यामुळे भारतीय निर्यातीला मोठी चालना मिळेल.

### भारताची भूमिका आणि ऊर्जा सुरक्षा

परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, 1.4 अब्ज भारतीयांची 'ऊर्जा सुरक्षा' हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. जागतिक परिस्थिती आणि बाजारपेठेनुसार भारत आपल्या ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणण्याचे धोरण सुरू ठेवणार आहे. केंद्र सरकारने या कराराचे स्वागत केले असून यातून 30 ट्रिलियन डॉलर्सची अमेरिकन बाजारपेठ भारतीय निर्यातदारांसाठी खुली होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.



शिवसेना




शिवसेना
०९ फेब्रुवारी
शिवसेना मुख्यनेते महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उप-मुख्यमंत्री
मा.श्री. एकनाथ शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.!
श्री. राजन मराठे
मा. नगरसेवक
सौ. ज्योति राजन मराठे
नगरसेविका प्रभाग क्र.२८ (ब)
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका
श्री. सुरज राजन मराठे
नगरसेवक प्रभाग क्र.२८ (ड)
युवा सेना विधानसभा अध्यक्ष
(कल्याण ग्रामीण)




प्रगतिशील महाराष्ट्राचं महानेतृत्व
महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री
मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब
९ फेब्रुवारी
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. गणेश म. कांबळे
नगरसेवक ठा.म.पा.




शिवसेना मुख्यनेते
महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय
उप-मुख्यमंत्री
मा.श्री. एकनाथ शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.!
श्री. राकेश दशरथ पाटील
(उपशहरप्रमुख कळवा)
सौ. रचना राकेश पाटील
(सह संघटक कळवा मुंद्रा विधानसभा)




शिवसेना
९ फेब्रुवारी
महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात लोकप्रिय नेतृत्व
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आपणांस वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. अविनाश भिवा पाटील
शिवसेना विभाग प्रमुख
कु. प्रियांका अविनाश पाटील
नगरसेविका ठा.म.पा.



महाराष्ट्राचे
लोकनायक
महाराष्ट्राचे
लाडके उपमुख्यमंत्री
मा. ना. श्री.
एकनाथजी
शिंदे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
९
फेब्रुवारी
शिवसेना
श्री. उमेश काशिनाथ पाटील
मा. स्थानिक नगरसेवक, स्थायी समिती सदस्य ठा.म.पा.




महाराष्ट्राचे
लाडके उपमुख्यमंत्री
मा.ना.श्री.
एकनाथ
शिंदे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा
९
फेब्रुवारी
DEDICATED
COMMON
MAN
विकसनशील महाराष्ट्राचे
विकासपुरुष
शुभेच्छुक
श्री. संतोष प्रभाकर तोडकर
नगरसेवक, ठा.म.पा.
शिवसेना


जनसामान्यांचे
लोकनाथ
९
फेब्रुवारी
मा.ना.श्री.
एकनाथजी शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आपणांस वाढदिवसाच्या
आदरपूर्वक
शुभेच्छा
शिवसेना
श्री.विकास कृष्णा रेपाळे
संपर्कप्रमुख - शिरूर लोकसभा,
नगरसेवक ठा.म.पा.
सौ. नम्रता भोसले-जाधव
उपशहरप्रमुख - कोपरी पाचपाखाडी विधानसभा,
नगरसेविका ठा.म.पा.







'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१



शिवसेना







०९ फेब्रुवारी
महाराष्ट्र
राज्याचे लोकप्रिय
उप-मुख्यमंत्री
श्री. एकनाथजी
संभाजी शिंदे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
धर्मवीरांचे
प्रतिबिंब
श्री. किशोर पाटकर
नगरसेवक, नवी मुंबई महानगरपालिका




०९ फेब्रुवारी
महाराष्ट्र राज्याचे
लोकप्रिय
उप-मुख्यमंत्री तथा
पालकमंत्री (ठाणे जिल्हा व मुंबई शहर)
श्री. एकनाथजी
संभाजी शिंदे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
लोकांचा
लोकनाथ
महाराष्ट्राचा
एकनाथ
सौ. अबोली महेश कुलकर्णी
नगरसेवक प्रभाग क्र.२० (ब)
नवी मुंबई महानगरपालिका
श्री. महेश सुरेश कुलकर्णी
युवा बेलापूर विधानसभा अध्यक्ष
श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी
नगरसेवक प्रभाग क्र.२० (क)
नवी मुंबई महानगरपालिका





महाराष्ट्राच्या
विकासाचा
मानबिंदू
९
फेब्रुवारी
मा.ना.श्री.
एकनाथजी शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आपणांस वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा
शिवसेना
शुभेच्छुक :
अन्वर भाई कच्छी
अध्यक्ष : शिवसेना मुस्लिम संघ विभाग




शिवसेना
शिवसेना मुख्य नेते
महाराष्ट्र राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री,
तथा संवेदनशील उपमुख्यमंत्री
मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे साहेब
यांस वाढदिवसाच्या मन:पुर्वक शुभेच्छा
९
फेब्रुवारी
मृणाल राम रेपाळे
युवासेना उपाध्यक्ष




लोकनेता एकनाथ संभाजी शिंदे



**मी पत्रकारीतेच्या बुटात पाय घातला की, मी कितीही प्रयत्न केला तर मला खोटं बोलता येत नाही. जसे शहीद सरदार भगतसिंग यांच्या संदर्भातील एक शेर सुप्रसिद्ध आहे तो असा 'मेरी कलम इतनी वाकिफ है मेरे जज्बातो से, की मैं कागज पर कलम से, इश्क भी लिखना चाहू, तो भी इन्कलाब लिखा जाता है' त्यामुळे जेंव्हा मला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लिहिण्याची विनंती ज्यावेळी आली तेंव्हा एकूणच महाराष्ट्रच्या राजकारणाचा चाळीस वर्षांचा पट माझ्या समोर उभा राहील आणि त्यात एकनाथ शिंदे यांची पंचवीस वर्ष आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय, विरोधकांना दिलेली धोबीपछाड, केलेले राजकीय तह आणि प्रसंगी दाखवलेला आक्रमकपणा त्यातून मला जे बुद्धीला आकलन झाले त्यातून मला स्पष्टपणे जाणवते की, 'उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे येणाऱ्या काळातील मराठा - बहुजन राजकारणाचा नवा पासवर्ड आहे'.**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'मराठा - बहुजन राजकारणाचा नवा पासवर्ड'

तुम्ही विचाराल कसे काय ? हे समजून घेण्यासाठी तुम्हाला माझ्यासोबत महाराष्ट्राच्या राजकारणाच्या फ्लॅश बँक मध्ये जाणे भाग आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाचा एक फॉर्म्युला होता, जो मराठा आणि दलित बहुजन युतीच्या अंगाने जातो. दुसरा जनसंघाचा फॉर्म्युला जो उच्चवर्णीय, धर्म आणि उद्योगपती युतीच्या यांच्या जातो. भाजपचा पूर्वसूरी असलेला जनसंघ आणीबाणीच्या काळात जनता पार्टीत विलीन होऊन सर्व प्रथम स्वातंत्र्या नंतर देशाच्या राजकीय पटलावर मोठ्या प्रमाणात आला. याबाबत नंतर विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांत प्रचंड खल झाला आणि जनसंघाला सोबत घेणे जयप्रकाश नारायण यांची ही राजकारणातील सर्वात मोठी चूक होती, हे आता अनेक समाजवादी आणि साम्यवादी विद्वान मान्य करतात. जनता पार्टी मुळे संघाला मान्यता आणि ओपन कॅनव्हास उपलब्ध झाला. असे झाले तरी देशातील आणि महाराष्ट्रातील काँग्रेसी राजकारणाला काउंटर करेल असा फॉर्म्युला अद्याप जनसंघ अर्थात नंतरच्या भाजपच्या हातात आला नव्हता. तो रथयात्रा आणि राम मंदिर आंदोलनाने हातात आला. हे आंदोलन जस जसे देशात पसरू लागले आणि भाजपने आपल्या हातात असलेल्या प्रसार माध्यमाचा, संत आणि धार्मिक नेत्यांचा जो सफाईदारपणे वापर केले त्याने देशभरात भाजपचे नगरसेवक, आमदार निवडून येऊ लागले. भाजपचा हा फॉर्म्युला म्हणजे देशातील मतदार हा विकास,गरीब हटाव यांच्या ऐवजी भारतीय मतदार हिंदू,हिंदुत्व आणि हिंदूराष्ट्र च्या मुद्द्यावर मतदार भावना प्रधान होऊन मतदान करू शकतो हे भाजपला समजले, शिवाय भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा प्रभाव ओसरला होता, काँग्रेसी नेत्यांचे भ्रष्टाचार, लफडी बोफोर्सची दलाली असे विषय ऐरणीवर होतेच. भाजपच्या हातात या फॉर्मुल्याच्या रूपाने जणु काही अलाउद्दीनचा चिराग हाती आला आणि त्यांनी जिथे जिथे तो मोठ्या प्रमाणात वापरला तिथे त्यांच्या पदरात यश मिळू लागले यात उत्तरेकडील राज्य मोठ्या प्रमाणात प्रभावात आली. त्यांचे कारण यापरिसरात असलेली धार्मिक स्थळे आणि त्यावर अवलंबून असणारी राज्याची अर्थव्यवस्था मात्र महाराष्ट्रात भाजपला अजूनही फार यश मिळत नव्हते. भक्कम पाया रोवण्यासाठी योग्य फॉर्म्युला आणि सोबत मिळत नव्हती. यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे भाजपच्या मदतीला आले. भाजपचे नेते प्रमोद महाजन, लालकृषणा आडवाणी, अटलबिहारी वाजपेयी यांनी शिवसेनाप्रमुख यांची हिंदुत्ववादी आक्रमक नेता म्हणून जी प्रतिमा तैयार झाली होती त्याचा योग्य वापर महाराष्ट्रात करण्यास सुरुवात केली. असे असले तरी देखील भाजपला यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय पॅटर्नला काउंटर करण्यासाठी पुरेसे नव्हते. ते मार्ग शोधत होते, तेंव्हा त्यांच्या लक्षात आले काँग्रेसचे पारंपारिक मतदार मराठा, दलित, आदिवासी आणि मोजक्या बहुजन जाती मतदार आहेत. मात्र मराठा वर्चस्वाने त्रस्त असणाऱ्या आणि स्वतासाठी राजकीय अवकाश शोधणाऱ्या माळी, धनगर आणि वंजारी ह्या तीन जाती अशा आहेत की त्या महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात लोकसंख्येने अधिक आहे आणि त्यांचे मतदान निवडणूक निकालावर प्रभाव टाकू शकते त्यातून "माधव" (माळी, धनगर आणि वंजारी ) हा फॉर्म्युला पुढे आला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत युती आणि माधव फॉर्म्युला यामुळे भाजपचा सत्तेकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

**'शरद पावर यांचे राजकारण'**

शरद पवार हे प्रचंड महत्वाकांशी नेते आहेत त्यांना उमजून आले की, काँग्रेस मध्ये उत्तर प्रदेश आणि दाक्षिणात्य लॉबी स्ट्राँग असून त्यांच्या पुढे फार काही करता येनार नाही.. यशवंतराव चव्हाण यांचे पंतप्रधान बनण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही ते आपण पूर्ण करु आणि त्यासाठी काँग्रेस मध्ये राहिल्यास ते अशक्य आहे. दाक्षिणात्य प्रदेशातील नेत्याच्या प्रमाणे आपले महाराष्ट्रात स्वतंत्र अस्तित्व आणि वर्चस्व असावे कारण गांधी घराने हे काही आपल्याला पंतप्रधान होऊ देणार नाही याची त्यांना स्पष्ट कल्पना आली होती त्यामुळे त्यांनी काँग्रेस कडून फारकत घेतली आणि महाराष्ट्रयात स्वतंत्र चूल मांडली. यामुळे ते काँग्रेस सोबत युतीत असले तरी ते नेहमी काँग्रेसचे मतदार संघ आणि नेते काबिज करण्याची एकही संधि सोडत नसत. यामुळे शरद पवार यांचे राजकारण हे महाराष्ट्र आणि काँग्रेसच्या राजकारणातला स्पीड ब्रेकर ठरू लागले होते. एकीकडे शरद पवार काँग्रेसच्या सोबत आणि शाहू फुले आंबेडकरी मुखवटा लाऊन राजकारणात वावरत मात्र त्यांचे संपूर्ण राजकारण हे उद्योगपती आणि भाजपच्या वळणाने जाणारे होते. त्यामुळे मराठा समाज नाईलाज किंवा पर्याय नाही म्हणून जरी काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मतदान करीत असले तरी त्याचा फायदा गरीब मराठा समाजाला पोहचत नव्हता. शरद पवाराच्या मर्जीतील मोजक्या मराठा समाजाला फायदा झाला मात्र मराठा समाजाची जी आर्थिक ओहटी सुरू होती त्यातही ओबीसी आरक्षणाने त्यांची राजकीय क्षेत्रातील देखील पीछेहाट होऊ लागली होती. जातीने उच्च वर्णीय पण आर्थिक परिस्थिती चार पिढ्या नंतर मराठ्यांची खंगू लागली. आपली ही अशी स्थिती का होते आहे याचे सामाजिक गणित नीट न उमजल्याने किंवा काँग्रेस राष्ट्रवादीने ते समजून न सांगितल्या मुळे. आरक्षणामुळे आपण गरीब झाल्याचा समज मराठा समाजाचा झाला आणि महाराष्ट्रात हजारो गावात दलित सवर्ण वादाच्या छावण्या उभ्या राहिल्या. त्यात हजारो बळी गेले. असे होणे भाजप - सेनेच्या आयते पथ्यावर पडले. ओबीसी आणि मराठ्यांचा हा असंतोष त्यांना सेना भाजप कडे घेऊन गेला आणि काँग्रेस राष्ट्रवादीचे महाराष्ट्रातील राजकारण हे खंगत गेले. आज राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे कधी काळी महाराष्ट्राच्या राजकारणात दादा लोकं होती. त्यांच्यावर त्यांचाच पक्ष विस्कळीत झाल्याचे चित्र आहे.

**'शिवसेनाप्रमुखांच्या नंतरची शिवसेना'.**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतर उद्धव ठाकरे यांच्याकडे पक्षाची सूत्र आली. त्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून काही शिवसेना नेते बाहेर गेले. मात्र शिवसेनाप्रमुखांचा वारसा असल्याने अनेक आमदार आणि खासदार त्यांच्याकडे राहिले. विधानसभा निवडणुकीत शिवसेने पेक्षा काही जागा भाजपला ज्यादा मिळाल्या आणि मुख्यमंत्री पदाची खुर्ची ही भाजपकडे गेली आणि इथून शिवसेनेला धक्के देऊन भाजपने स्वतःची प्रतिमा आणि महत्व वाढवण्यास महाराष्ट्रात सुरुवात केली. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी त्यांचे होम ग्राउंड असणाऱ्या विदर्भाकडे सर्वाधिक लक्ष पुरवून आपले होमग्राऊंड मजबूत केले. सेना आमदारांची कामे न होणे, निधी न मिळणे आणि सेना जणू काही नावाला सत्तेत आहे तिची भाजपला फार गरज नाही आणि युतीतून बाहेर पडले तर लोक त्यांना स्वीकानार नाहीत यांची खात्री भाजपला होती त्यामुळे त्यानं आपल्या पक्षाची मुळे जितकी मजबूत करता येतील तेवढी त्यांनी केली त्यामुळे चार वर्ष उद्धव ठाकरे सामुदायिक राजीनाम्याची धमकी देत राहिले मात्र त्यांना खिशातून राजीनामे काही बाहेर काढता आले नाही. त्यामुळे त्यानंतर जेव्हा विधानसभा निवडणूक झाली सेना भाजप युतीत लढली त्याचा निकाल बाहेर आला. त्या निकालाकडे बघता भाजप आपल्या मदती शिवाय सत्तेत येऊच शकत नाही असे उद्धव ठाकरे यांना ज्यावेळी उमजले. तेंव्हा त्यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात वेगळी मात्र पुरेसा होमवर्क न करता स्वताचाच कपाळ मोक्ष करणारी खेळी खेळली. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शरद पवार आणि काँग्रेस सोबत आघाडी करून स्वतः मुख्यमंत्री बनून खुर्चीत बसले. लेकाला देखील मंत्री पदाची गाडी दिली, मात्र ही खेळी खेळताना उद्धव ठाकरे यांनी भाजपची केंद्रातील सत्तेच्या ताकदीचा अंदाज घेतला नाही आणि त्यामुळे उद्धव ठाकरे जो पर्यंत सत्तेत होते तो पर्यंत केंद्राने त्यांना त्रास देण्याची एकही संधी सोडली नाही आणि शेवटी शिवसेनाप्रमुखांचे विचार आणि तत्वज्ञान याचा हवाला देत शिवसेनेत भूकंप घडवून आणला. शिवसेनेतील क्रमांक दोनचे नेते एकनाथ शिंदे हे ४० आमदार आणि दहा खासदार यांना घेऊन त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या पुढे आव्हान उभे केले. ज्यातून उद्धव ठाकरे अद्यापही सावरले नाही आहेत.

**'उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांचा विद्रोह आणि त्यांच्या राजकारणाचे भवितव्य'**

मात्र आता प्रश्न उभा रहातो आहे की, उपमुख्यमंत्री असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या राजकारणाचे पुढील भवितव्य काय असेल ? ते तहहयात भाजपची बी टीम बनून रहातील की, येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात भाजप पेक्षा मोठे किंग मेकर ठरतील. जे एकनाथ शिंदे यांना ओळखतात ते सहज सांगतील की, शिवसेनेतून 40 आमदार घेऊन फुटून निघताना आपण मुख्यमंत्री जरी झालो तरी ते औट घटकेचे मुख्यमंत्री असणार हे काय एकनाथ शिंदे यांना माहीत नसेल काय ? किंवा भाजपच्या सरकार मध्ये इतकी वर्ष असल्याने भाजप नेमकी कशी चालते , काय करते याची कल्पना नसेल का ? तर नक्की आहे त्यामुळे मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यावर एकनाथ शिंदे यांनी मिळालेल्या संधीचा फायदा स्वताचा राजकीय आणि सामाजिक पाया कसा विस्तारीत करता येईल याकडे लक्ष पुरवले, ज्या पद्धतीने संघटना बांधली , जे निर्णय घेतले आणि ज्या पद्धतीने वाटचाल केली त्यातून त्यांनी काही ठळक गोष्टी केल्या

पहिली म्हणजे आपल्या सोबत असणाऱ्या आमदार, खासदार, नेते, जिल्हा प्रमुख यांच्या सोबत वीण घट्ट केली. हे करत असताना त्यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचा उपयोग आपली मराठा म्हणून असणारी प्रतिमा ठळक आणि घट्ट करण्यासाठी उपयोग तर केलाच शिवाय तमाम मराठा नेते आणि संघटना मध्ये "मैं हू ना" हा ठळक संदेश पाठवला. मराठा आंदोलन आणि त्याची ताकद ठळक करण्यासाठी अख्खे मंत्रिमंडळ मराठा आंदोलनाच्या ठिकाणी पाठवले. इतकेच नाही तर आपली संघटनात्मक ताकत देखील आंदोलनाच्या मागे लावली. त्यामुळे शरद पवार आणि छत्रपतीच्या मखरात बसलेल्या मराठा नेत्यांच्या पेक्षा आपल्या सारखाच संवेधनशील नेता एकनाथ शिंदे आहेत हा विश्वास एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजात पक्का केला. त्यानंतर समाजात जो अपप्रचार उद्धव ठाकरे आणि त्यांच्या समर्थकांनी चालवला होता त्याला त्यांच्यातले उरलेले आमदार, जिल्हा प्रमुख, नेते फोडत त्यांचा दावा किती फोल आहे हे सिद्ध करत राहिले आणि आज एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्या पेक्षा कितीतरी मोठे नेते म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरस्थावर झाले आहेत. कुठल्याही पक्षाला त्यांना ओलांडून किंवा गृहीत धरून पुढे जाता येणार नाही

त्यानंतर त्यांनी प्रशासनातील अशी पदे शोधली की, ज्यांना न्याय दिला की, सर्व ग्रामीण आणि शहरी भागात त्यांच्या नावाची चर्चा होईल. त्यानुसार त्यांनी ग्रामसेवक, पोलिस पाटील, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका यांच्या फायद्याचे निर्णय घेऊन आपल्या त्यांनी आपण काम करणारा नेता आहोत हा संदेश दिला, मुलींचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, बस मध्ये महिलांना अर्धे तिकीट, मुख्यमंत्री आरोग्य कक्षाच्या माध्यमातून लाखो रुग्णांना थेट दिलासा, कोल्हापूर मधील महापूर, इर्शाल वाडीतील नैसर्गिक आपत्ती यात दाखवलेली संवेदनशीलता यातून लोकांनी आता एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे नेते असल्याचे स्वीकारले आहे.

त्याच वेळी महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येत १७/१८% टक्के असलेल्या आंबेडकरी समाजाला आपल्या बाजूने करण्यासाठी महाराष्ट्राच्या इतिहासात कधी घडले नव्हते ते एकनाथ शिंदे यांनी केली, बौद्ध समाजात वर्षावासा नंतर बौद्ध पूजा करून भिक्खू संघाला चिवर दान दिले जाते तो सोहळा मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत अशा वर्षा निवासस्थानी ठेवून संपूर्ण महाराष्ट्रातील समाजाला मी तुमच्या बाजूचा आहे हा संदेश दिला. इतकेच नव्हे तर ""शाखा तिथे संविधान"" हा उपक्रम भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने घोषित करून आपण संविधांनाच्या बाजूचे आहोत, आंबेडकरी समाजाला आपल्या नेतृत्वा बद्दल विश्वास निर्माण केला आहे. इतकेच नव्हेतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या सोबत युती केली. त्यावेळी केलेल्या भाषणात एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभेत निळा फेटा घालून भाषण करताना ते आनंदराज आंबेडकर यांना म्हणाले ""आनंदराज जी, आप डॉ बाबासाहेब आंबेडकरजी का रक्त हो, तो हम बाबासाहेब आंबेडकरजी के भक्त है"" यामुळे आंबेडकरी समाजातली असंख्य कार्यकर्ते शिवसेनेत सामील होत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी देखील एकनाथ शिंदे यांनी नगरपालिका आणि महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने स्वताला सिद्ध केले अशी प्रतिक्रिया दिली . मुख्यमंत्री निवासाचे दरवाजे जे सर्वसामान्य व्यक्तींना कधी उघडे नव्हते ते दरवाजे, आपल्या मुख्यमंत्री काळात एकनाथ शिंदे यांनी खुले केले. वारकऱ्यांच्या साठी आर्थिक विकास महामंडळ, ब्राहमण समाजयासाठी परशुराम आर्थिक विकास मंडल, भजनी मंडळांना अनुदान, गोविंदा पथकांना विमा कवच, बौद्ध विहाराना दरवर्षी पन्नास लाख याप्रमाणे पाच वर्ष मदत , सहा डिसेंबर रोजी चैत्यभूमी येथे चोख व्यवस्था. आणि निवडणुकीत मास्टर स्ट्रोक ठरलेली लाडकी बहीण योजना. जेव्हा ही योजना सुरू झाली तेव्हा सुरुवातीला भाजप या योजनेच्या प्रचारात आघाडीवर नव्हती, ही योजना बूमरेंग झाली तर त्यात गेला तर एकनाथ शिंदे यांचा राजकीय बळी जाऊ दे. अश्या भूमिकेत होते. मात्र ही योजना गेम चेंजर होणार दिसल्यावर एकनाथ शिंदे या लाडक्या बहिणीचा लाडका भाऊ सोबत महाराष्ट्रात सर्वत्र देवाभाऊ ची पोस्टर लागली. मात्र आता कितीही मुख्यमंत्री आले तर या योजनेवर एकनाथ शिंदे हे नाव कायमचे कोरले गेले आहे.

आता महाराष्ट्राच्या विद्यमान राजकीय पाटलाकडे पाहू या. राष्ट्रवादीचे नेते अजितदादा पवार यांचा महाभयंकर विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या जागी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पासून विभक्त राहण्याचा निर्णय यातून ठळक झाला आहे. शरद पवार यांच्यावर वय आणि आजारपण यामुळे अनेक बंधन आली आहेत. त्यांच्यापुढे आहे तसे चालू देणे किंवा पक्ष विलीन करून भाजपसोबत जाणे असे दोन पर्याय आहे. किंवा सक्रिय राजकारणातून राजसंन्यास घेणे असा तिसरा पर्याय आहे. विलीनीकरण करून पुन्हा शरद पवार यांच्या वर्चस्वाखाली जाऊन आपले स्वातंत्र्य गमवायला राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि मुंडे तयार नाही आहेत आणि NDA सोबत मिळालेली सत्ता त्यांना सोडायची नाही आहे हे यापैकी अनेक नेत्यांनी प्रसार माध्यमाच्याकडे स्पष्ट केले आहे.

यासर्व प्रकारात तुम्ही एक गोष्टीकडे लक्ष दिले तर मराठा - बहुजन नेतृत्वाचा पट आता जवळपास रिकामा आहे. मराठा संघटना, ओबीसी संघटना आणि अनेक दलित संघटना त्यातील कार्यकर्ते आपल्या नेतृत्वाला अवकाश आणि पंख देणाऱ्याच्या शोधत आहेत आणि त्यांच्यासाठी येणाऱ्या काळात बहुजन - मराठा राजकारणाचा पासवर्ड जर कोण असेल तर तो म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांची शिवसेना आहे. आता पर्यन्त मराठा आणि बहुजन समाजाचे नेतृत्व हे ग्रामीण परिसरातून आलेले आपण बघतो होतो मग ते यशवंतराव चव्हाण असतील, वसंतदादा पाटील असतील किंवा शरद पवार असतील आता प्रथमच अर्बन आणि रूरल म्हणजे शहरी आणि गावाकडील लोकांच्या सोबत समान रूपाने नाळ जोडणारा नेता कोण असेल तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. येणाऱ्या काळात एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील राजकारणातील प्रमुख केंद्र म्हणून पुढे येईल. त्यांच्या मुळे महाराष्ट्रातील मराठा राजकारणाला पुन्हा ऊर्जा आणि नवी दिशा मिळण्याचे संकेत दिसू लागले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात एकनाथ शिंदे हे भाजपची गरज म्हणून पुढे येतील, त्यांना सोडून जर ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या कडे गेले तर, भाजप आपली पत आणि विश्वासारता गामाऊन बसेल. भाजपने कितीही प्रयत्न केला तरी ती मराठा राजकारणाचा चेहरा होऊ शकत नाही हे इतिहासात सिद्ध झाले आहे, भाजपने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून किसनराव वाखिंडे यांना देवून पाहिल मात्र त्याचा फार फायदा भाजपला झाला नाही. भाजपचा जो चेहरा आहे त्यासाठी अडचणीचा आहे आणि मराठा समाजात फडणवीस यांच्या बद्दल साजरे मत नाही आहे. त्यामुळे सध्यातरी एकनाथ शिंदे यांच्यासाठी हे महाराष्ट्राचे हे मैदान उपजाऊ आणि अनुकूल आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात "मराठा आणि बहुजन राजकारणाचा पासवर्ड म्हणून " उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व पुढे येण्याच्या तैयारीत आहे आणि जी खेळी भाजपने उद्धव ठाकरे यांच्या सोबत खेळली ती खेळी ते एकनाथ शिंदे यांच्या सोबत खेळू शकणार नाही. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आहे.




**किरण सोनवणे,**
प्रवक्ता शिवसेना (महाराष्ट्र )
९९२२६६६६०७
किरण सोनावणे
ibn लोकमत, पत्रकार






# भारताची विजयी सलामी ! अमेरिकेवर 29 धावांनी केली मात

मुंबई : टी-२० विश्वचषक २०२६ (T20 World Cup 2026) स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात भारतीय संघाची अवस्था बिकट झाली असताना कर्णधार सूर्यकुमार यादवने झळकावलेले दमदार अर्धशतक आणि त्यानंतर गोलंदाजांनी केलेल्या सुरेख माऱ्याच्या बळावर भारताने अमेरिकेला २९ धावांनी नमवित विजयी सलामी दिली.

मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या अटीतटीच्या सामन्यात अमेरिकेच्या गोलंदाजांनी भारतीय फलंदाजीला खिंडार पाडले होते, मात्र सूर्यकुमारच्या झंझावाती ८४ धावांच्या जोरावर भारताने अमेरिकेसमोर १६१ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य ठेवले आणि भारतीय गोलंदाजांनी केलेल्या चिवट गोलंदाजीच्या बळावर अमेरिकेचा डाव ८ बाद १३२ धावांवर रोखला.

अमेरिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांच्या गोलंदाजांनी हा निर्णय सार्थ ठरवला. दुसऱ्याच षटकात अली खानने सलामीवीर अभिषेक शर्माला शून्यावर बाद करून भारताला पहिला धक्का दिला. त्यानंतर इशान किशन आणि तिलक वर्मा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला खरा, पण सहावे षटक भारतासाठी अनापेक्षित ठरले.

शेंडली वॅन शाल्क्विकने या एकाच षटकात इशान (२०), तिलक (२५) आणि शिवम दुबे (०) यांना तंबूचा रस्ता दाखवत भारतीय डावाचे कंबरडे मोडले. एका टप्प्यावर भारताची अवस्था ४ बाद ४६ अशी नाजूक झाली होती.

मधल्या फळीत रिंकू सिंग (६) आणि हार्दिक पांड्या (५) स्वस्तात बाद झाल्याने वानखेडेवर शांतता पसरली होती. मात्र, एका बाजूने कर्णधार सूर्यकुमार यादवने डावाची सूत्रे आपल्या हातात घेतली. त्याने अक्षर पटेलसोबत महत्त्वपूर्ण ४१ धावांची भागीदारी करत संघाला शंभरचा टप्पा ओलांडून दिला.

शेवटच्या षटकांमध्ये सूर्याने आक्रमक खेळ केला. त्याने मैदानाच्या चौफेर फटकेबाजी करत ४९ चेंडूत १० चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ८४ धावांची खेळी साकारली. विशेषतः २० व्या षटकात त्याने २१ धावा कुटल्या, ज्यामुळे भारताला ९ बाद १६१ धावांपर्यंत मजल मारता आली.

१६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या अमेरिकेच्या संघाची सुरुवात चांगली झाली नाही. अँड्रिज गॉस, साईतेजा मुक्कामल्ला आणि कर्णधार मोनांक पटेल झटपट बाद झाले आणि अमेरिकेच्या संघाची अवस्था ३.२ षटकांत ३ बाद १३ अशी बिकट झाली. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंग यांनी टिचून मारा करत अमेरिकेच्या संघाला चांगलेच धारेवर धरले.

आपल्या पहिल्या तीन षटकांत सिराजने १८ तर अर्शदीपने अवघ्या ११ धावा खर्च केल्या. मिलिंद कुमार आणि संजय कृष्णमूर्ती यांनी ४ थ्या गड्यासाठी ५८ धावांची भागीदारी करत अमेरिकेचा डाव सावरला, मात्र अपेक्षित धावगती राखण्यात त्यांना अपयश आले. वरुण चक्रवर्तीने मिलिंद कुमारला ३४ धावांवर बाद करत ही भागीदारी तोडली.

त्यानंतर अक्षर पटेलने संजय कृष्णमूर्ती आणि हरमीत सिंगला लागोपाठच्या चेंडूवर बाद करत अमेरिकेच्या उरल्यासुरल्या आशा संपुष्टात आणल्या. शेवटच्या ४ षटकांत अमेरिकेच्या संघाला ६१ धावांची आवश्यकता होती, तेव्हा शुभम रंजने (३१) याने काही एकाकी झुंज दिली; मात्र अमेरिकेचा संघ निर्धारित २० षटकांत ८ बाद १३२ धावांपर्यंतच मर्यादित राहिला.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन–2026 च्या माध्यमातून सुरक्षित समुद्रकिनारा समृद्ध भारत'चा संदेश

# वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या उपस्थितीत डहाणू येथे भव्य स्वागत

पालघर : : तटीय सुरक्षा जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता आणि सामुदायिक सहभाग मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (CISF) वतीने "वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन–2026" च्या दुसऱ्या वर्धापनचा भव्य शुभारंभ करण्यात आला आहे. देशाच्या सागरी सुरक्षेला बळकटी देणारा हा उपक्रम एक ऐतिहासिक राष्ट्रीय आंदोलन ठरत आहे.





वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या उपस्थितीत डहाणू येथे भव्य स्वागत दि. 10 फेब्रुवारी रोजी सकाळी 5 वाजता सायकल रॅली दमन येथून रवाना होणार असून सकाळी सुमारे 9 ते 9.30 दरम्यान डहाणू येथे पोहोचणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड, उपविभागीय अधिकारी विशाल खत्री, यांच्या उपस्थितीत शालेय विद्यार्थी व ग्रामीण मच्छीमारांच्या रंगारंग कार्यक्रमांतून सायकलस्वारांचे स्वागत करण्यात येणार आहे. सकाळी 11 वाजता तारापूर येथे TAPS च्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. जूचंद्र येथील चंडिका देवी मंदिर येथे सायकलस्वार यांचा रात्री मुक्काम होणार असून दिनांक 11 फेब्रुवारी रोजी सकाळी 5 वाजता सायक्लोथॉन जूचंद्र येथून मुंबई येथील गेट वे ऑफ इंडिया कडे रवाना होणार आहेत

भारताच्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्यावर 250 हून अधिक बंदरे असून, त्यामध्ये सुमारे 72 EXIM बंदरांचा समावेश आहे. ही बंदरे देशाच्या जवळपास 95 टक्के व्यापाराची हाताळणी करतात. तटीय भागातील रिफायनऱ्या, जहाजबांधणी केंद्रे आणि अणुऊर्जा प्रकल्प भारताच्या आर्थिक विकास व ऊर्जा सुरक्षेचा कणा असले तरी, अमली पदार्थ, शस्त्रे, स्फोटके यांची तस्करी, घुसखोरी व इतर बेकायदेशीर कारवायांचे धोके सातत्याने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर गेल्या पाच दशकांहून अधिक काळापासून CISF कडे देशातील 12 प्रमुख बंदरे व तटीय भागातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे. पहिल्या CISF कोस्टल सायक्लोथॉनला देशभरातून मिळालेल्या प्रतिसादानंतर, 2026 मधील दुसरी आवृत्ती अधिक व्यापक स्वरूपात आणि नव्या राष्ट्रीय संकल्पनेसह राबविण्यात येत आहे.

वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन–2026 चा शुभारंभ 28 जानेवारी 2026 रोजी करण्यात आला. केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियम, नवी दिल्ली येथून वरिष्ठ अधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत या सायक्लोथॉनला दूरदृष्य प्रणाली द्वारे हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.

ही सायक्लोथॉन "सुरक्षित तट – समृद्ध भारत" या संकल्पनेवर आधारित असून, वंदे मातरम्च्या भावनेतून राष्ट्रीय अभिमान, एकता आणि समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सामूहिक जबाबदारीचा संदेश देत आहे.

## 25 दिवस, 6,553 किलोमीटरचा ऐतिहासिक प्रवास

ही सायक्लोथॉन 25 दिवसांत 6,553 किलोमीटरचा प्रवास करत भारताच्या संपूर्ण मुख्य भूमीवरील समुद्रकिनारा व्यापणार आहे. त्यामुळे हा देशातील आतापर्यंतचा सर्वात व्यापक तटीय सायकल उपक्रम ठरत आहे. CISF चे दोन सायकल संघ एकाच वेळी रवाना झाले असून, पश्चिम किनारा – लखपत किल्ला, कच्छ (गुजरात) पूर्व किनारा – बक्खाली, दक्षिण 24 परगणा (पश्चिम बंगाल) येथून प्रवासास सुरुवात झाली आहे. दोन्ही संघ 22 फेब्रुवारी 2026 रोजी कोच्ची (केरळ) येथे एकत्र येणार आहेत. या प्रवासात पश्चिम किनाऱ्यावर सुरत, मुंबई, गोवा, मंगळूरू तर पूर्व किनाऱ्यावर हल्दिया, कोणार्क, पारादीप, विशाखापट्टणम, चेन्नई, पुद्दुचेरी आणि कन्याकुमारी ही प्रमुख शहरे मार्गावर येणार आहेत.

या सायक्लोथॉनमध्ये CISF चे 130 अधिकारी सहभागी असून, त्यामध्ये 65 महिला अधिकारी यांचा समावेश आहे. सर्व सहभागी अधिकारी यांनी एक महिन्याहून अधिक काळ कठोर प्रशिक्षण घेतले असून, सहनशक्ती, पोषण व्यवस्थापन, सायकल सुरक्षा, दीर्घ पल्ल्याचे सायकलिंग, शरीरमुद्रा आणि कार्यक्षम पॅडलिंग तंत्र यावर विशेष भर देण्यात आला आहे. प्रशिक्षणासाठी व्यावसायिक सायकलपटूंचे मार्गदर्शनही घेण्यात आले.

## जनजागृती, सुरक्षा आणि समाजाशी संवाद

या सायक्लोथॉनचे प्रमुख उद्दिष्ट तटीय समुदायांमध्ये अमली पदार्थ, शस्त्रे व स्फोटकांच्या तस्करीविषयी जागरूकता वाढवणे, तटीय सुरक्षा यंत्रणा व स्थानिक नागरिकांमध्ये भागीदारी मजबूत करणे, तसेच स्वातंत्र्यसैनिक, शहीद व सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या बलिदानाचा सन्मान करणे हे आहे. यासोबतच युवकांमध्ये फिटनेस, शिस्त आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसारही या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे.

सायक्लोथॉनदरम्यान CISF सायकलस्वार 50 पेक्षा अधिक तटीय गावांमध्ये रात्र विश्रांती घेणार असून, पुढील काळात CISF आपल्या 47 तटीय युनिट्सद्वारे सतत संवाद साधणार आहेत . स्वच्छ भारत अभियान, वृक्षारोपण, भरती व फिटनेस जनजागृती तसेच मच्छीमार व स्थानिक समुदायांशी थेट संवाद हे उपक्रम यामध्ये समाविष्ट आहेत.

## देशभरात माध्यम समन्वय

संदेशाचा व्यापक प्रसार करण्यासाठी अहमदाबाद, मुंबई, गोवा, बेंगळुरू, कोच्ची, कोलकाता, भुवनेश्वर, विशाखापट्टणम आणि चेन्नई येथे एकाच वेळी प्रेस ब्रीफिंगचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहिती, मार्ग व कार्यक्रमांच्या तपशीलासाठी www.cisf.gov.in या CISF च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने केले .

# राजमाता जिजाऊ असे एसटीच्या नव्या बसेसचे नामकरण

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती




मुंबई : महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना ' हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले असल्याची ,माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

### इतिहासाचा सन्मान, प्रवासात आराम

मंत्री सरनाईक म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब! त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटी च्या नवीन बसेसचे राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापुर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे."

### अधिक आसन क्षमता — प्रवाशांना मोठा दिलासा

सध्याच्या बसेसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसेसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गांवर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे."असे मंत्री सरनाईक म्हणाले.

### परंपरा आणि प्रगतीचा सुंदर संगम

"'राजमाता जिजाऊ' हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बसेस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील." असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# तब्बल ३३ कोटींची साडी

रमाबाई बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना म्हणून 39 कोटींची साडी बनवण्यात आली. या साडीसाठी 33 कोटींचे हिरे आणि दोन किलो सोन्याचा वापर करण्यात आला. माता रमाईंच्या स्मरणार्थ गोल्डन मॅन उद्योजक रोहित पिसाळ यांनी ही साडी बनवली आहे.



# जुन्नरमधील शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या लहानग्यांच्या कुटुंबाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिला मदतीचा हात

पुणे, जुन्नर : शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या आफान अफसर ईनामदार ( वय १०) आणि रीफत अफसर ईनामदार ( वय ७) या चिमुकल्यांच्या कुटुंबियांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच लाख रुपयांची मदत देऊ केली . नगरपालिका निवडणुकीवेळी जुन्नरमध्ये प्रसारासाठी आले असता त्यांना या दुर्दैवी घटनेबद्दल कळल्यानंतर त्यांनी ईनामदार कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली होती. त्यानंतर आता त्यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला आहे.

जुन्नरमध्ये २२ नोव्हेंबर रोजी घडलेल्या दुर्वेवी घटनेत अफसर इनामदार यांची दोन्ही मुले खेळत असताना शेततळ्यात पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पुर्ण जुन्नर तालुका हळहळला, त्याच वेळी १ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी जुन्नर येथे गेले असता स्थानिक शिवसेना नगरसेवक मयुर महाबरे यांनी ही घटना आमदार शरद सोनवणे यांना सांगितली. त्यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानावर ही बाब घातली. यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रचारातून वेळात वेळ काढून ईनामदार कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांना मदतीचे आश्वासन दिले.

त्यानुसार दि ६ फेब्रुवारी रोजी शिवसेनेच्या वतीने आमदार शरद सोनवणे, शिवसेना सचिव राम रेपाळे आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, स्थानिक नगरसेवक मयुर महाबरे आणि स्थानिक शिवसैनिकांनी ईनामदार कुटुंबाची भेट घेऊन पाच लाखांची ही मदत त्यांना सुपुर्द केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः व्हिडीओ कॉलद्वारे संवाद साधून इनामदार कुटुंबियांचे सांत्वन केले. "झालेली घटना दुर्दैवी असून स्वतःची मुले गमावण्याचे दुःख काय असते ते मला चांगले माहिती आहे, गेलेली व्यक्ती परत आणता येणे शक्य नसले तरीही या दुःखातून सावरण्यासाठी शिवसेना आपल्याला लागेल ती सर्व मदत नक्की करेल असे सांगितले. आपली झालेली हानी भरून काढता येणे अशक्य असले, तरीही या दुःखातून सावरण्यासाठी आपल्याला मदत पाठवली असून ती आपण मोठ्या मनाने स्वीकारावी ." अशी विनंती शिंदे यांनी केली.

बिल्डर सुशील रहेजा प्रकरण

# कार्यकर्त्यांची अटक बेकायदेशीर न्यायालयाने पोलिसांना फटकारले!

## 'वंचित'च्या सर्व कार्यकर्त्यांची सुटका !

मुंबई : मुंबईत राहुल जाधव या तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करणारा, मारहाण करणारा आरोपी बिल्डर सुशील रहेजा विरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली आहे. अट्रॉसिटी सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी बिल्डर सुशील रहेजा अद्याप मोकळा असताना, दुसरीकडे त्याच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना मुंबई पोलिसांनी बेकायदेशीर अटक केल्याने खळबळ माजली होती.

सुशील रहेजाने त्याच्याकडे कामाला असलेल्या राहुल जाधव यांना "तुम जयभीम वाले गंदे लोग, तुम साले घाटी, सुधरेंगे नही" म्हणत भर ऑफिसमध्ये मारहाण केली होती. या प्रकरणी आरोपी सुशील रहेजावर अट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल असताना सुद्धा त्याला पोलिसांनी अटक केली नाहियें.

काल रात्री पोलिसांनी वंचित बहुजन महिला आघाडी मुंबई प्रदेशाध्यक्ष स्नेहल सोहनी, युवा आघाडी मुंबई अध्यक्ष सागर गवई आणि इतरांना बिल्डर रहेजाचे ऑफिस तोडफोड प्रकरणी अटक केली होती. आज त्यांना भोईवाडा न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने मुंबई पोलिसांना फटकारले आहे. 'ही अटक बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.' वंचित बहुजन आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांची सुटका न्यायालयाने केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण आहे की, "एखाद्या गुन्ह्यामध्ये ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षा असेल तर त्या गुन्ह्यात आरोपींना नोटीस देणे बंधनकारक असते. त्या गुन्ह्यात जर आरोपी पोलिसांना चौकशीसाठी सहकार्य करत असेल तर त्याला अटक करण्याची आवश्यकता नसल्याचे कायदा सांगतो." मुंबई पोलिसांनी कुठलीही नोटीस न देता थेट अटक केली होती.

मुंबई पोलिसांनी बिल्डर रहेजा आणि राजकीय पक्षांच्या दबावाखाली हे खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने

# जे.जे. रुग्णालयात डॉ.नीलम गोऱ्हे यांच्यावतीने नवमाता व बालकांना वस्त्रदान

मुंबई : महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते ना. एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस म्हणजे केवळ राजकीय सोहळा नव्हे, तर माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी असते. याच भावनेतून, त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुंबईतील सर जे .जे. रुग्णालयात नवमाता आणि नवजात बालकांसाठी 'वस्त्रदानाचा' हृदयस्पर्शी उपक्रम पार पडला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते हा कार्यक्रम संपन्न झाला.

आई होण्याच्या आनंदात आणि प्रसुती वेदनेतून सावरणाऱ्या मातांसाठी तसेच या जगात पहिले पाऊल टाकणाऱ्या चिमुकल्या जीवांसाठी हे वस्त्रदान म्हणजे मायेची ऊब ठरली. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वतः नवमातांशी संवाद साधत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली आणि बालकांना मायेने वस्त्रे अर्पण केली. अनेक गरजू मातांच्या डोळ्यांत यावेळी समाधानाचे अश्रू तर ओठांवर कृतज्ञतेचे शब्द उमटले.



या उपक्रमादरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रुग्णालयातील सोयी-सुविधांचा आढावा घेतला. जे.जे. प्रशासनाने दिलेल्या सर्व प्रस्तावांवर शासन दरबारी सकारात्मक पाठपुरावा करणार असून, आगामी अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार बैठक घेण्यात येईल असे देखील त्यांनी सांगितले. तसेच, रुग्णालयातील वॉर्ड्सच्या नुतनीकरणासाठी डॉ. गोऱ्हे स्वतः विशेष प्रयत्न करणार आहेत.

मुंबईतील या यशस्वी उपक्रमानंतर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथेही डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शहर संघटक आनंद गोयल यांच्या माध्यमातून अशाच प्रकारच्या सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी शिवसेना उपनेत्या कला शिंदे, दिलीप नाईक, जितेंद्र सपकाळ, संपर्कप्रमुख वर्षा मोरे, महिला विभागप्रमुख नीलम पवार, रेखा सुरणकर, पुणे शहर संघटक आनंद गोयल, अल्का माने, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली वाढे, संतोष सावंत, जन्नत परवीन आदी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्याचबरोबर या कार्यक्रमास रुग्णालयातील वैद्यकीय डीन डॉ.संजय सुरासे, डॉ.विजय कल्याणकर, डॉ.सोनाली देशमुख, डॉ.अरुण राठोड, डॉ.मयुरी वावधने, डॉ.अर्चना पाटील, चित्रा सेलवराज, नितीन कोलंबकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जे जे हॉस्पिटलमधील जवळपास सर्व म्हणजे निवासी १००० रुग्णांना अन्नदानही करण्यात आले.माणुसकीच्या स्पर्शाने उजळलेला हा वाढदिवस अनेकांच्या आयुष्यात उत्साहाचा किरण ठरला असून, सर्वांनी लाडक्या उपमुख्यमंत्र्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


शिवसेना


महाराष्ट्राचा
बुलंद
आवाज
मा.ना.
एकनाथजी
शिंदे साहेब
महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री
तथा शिवसेना मुख्य नेते
शिवसेना
आपणास
उदंड आयुष्य
लाभो...
रोहित पिंपळीलकर
शाखाप्रमुख
जयप्रकाश कोटवानी
उपशहर प्रमुख कोपरी-पाचपाखाडी
शिवसेना कोपरी विभाग
नगरसेवक, नगरसेविका, विभाग सचिव, विभाग संघटक, विभाग समन्वयक, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख,
समस्त शाखा प्रमुख, उपशाखाप्रमुख व समस्त महिला आघाडी, युवासेना व शिवसेना


शिवसेना
९
फेब्रुवारी
शिवसेना
चेहरा ठाणेकरांचा
ताकद महाराष्ट्राची
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
श्री. शरद कणसे
सौ.निर्मला कणसे
श्री. निखिल कणसे


शिवसेना
लोकांचा
लोकनाथ
महाराष्ट्राचा
एकनाथ
शिवसेना मुख्यनेते
महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय
उप-मुख्यमंत्री
मा.श्री.
एकनाथ
शिंदे साहेब
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा.!
०९
फेब्रुवारी
श्री.पंढरीनाथ पाटील
मा.नगरसेवक सहसंपर्क प्रमुख कल्याण
ग्रामीण वि.सभा
ॲड.स्वप्निल पाटील
विभागप्रमुख 80,81 डोंबिवली
सौ.दिपाली स्व.पाटील
मा.नगरसेविका-क.डो.म.पा.


शिवसेना
प्रगतिशील
महाराष्ट्राचं
महानेतृत्व
मा.ना.श्री.
एकनाथ शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
९
फेब्रुवारी
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. गणेश टाक
विभाग समन्वयक
ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र


हिंदुत्वाचा
श्वास...
महाराष्ट्राचा
विश्वास...
९
फेब्रुवारी
मा.ना.श्री.
एकनाथ शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
श्री. शांताराम मोरे
आमदार
भिवंडी ग्रामीण विधानसभा


शिवसेना
महाराष्ट्राचे
लाडके उपमुख्यमंत्री
मा.ना.श्री.
एकनाथ
शिंदे साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा
९
फेब्रुवारी
महाराष्ट्राचे लोकनाथ
शुभेच्छुक
श्री. प्रकाश पाटील
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ
शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख (ग्रामीण)


शिवसेना
९
फेब्रुवारी
उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य
मा.ना.श्री. एकनाथजी
संभाजी शिंदे साहेब
शुभेच्छुक :- राम भाऊ येंकुरे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!


लोकांचा लोकनाथ
महाराष्ट्राचा एकनाथ
महाराष्ट्र राज्याचे
लोकप्रिय उप-मुख्यमंत्री
श्री. एकनाथजी
संभाजी शिंदे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
०९
फेब्रुवारी
शिवसेना
सौ. अश्विनी कमलेश निकम
नगरसेविका, उ. मनपा


०९
फेब्रुवारी
शिवसेनेचे मुख्यनेते
महाराष्ट्र राज्याचे
उपमुख्यमंत्री
ठाणे व मुंबई शहराचे
पालकमंत्री
शिवसेना
उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
मा. श्री. एकनाथजी
संभाजी शिंदे साहेब
श्री. हेमंत पवार
ठाणे शहरप्रमुख
(ठाणे विधानसभा क्षेत्र)